cmyk

दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-५२ | सोमवार दि.११ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### महाराष्ट्राच्या राजकारणात नवे ध्रुवीकरण?

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीतील भाजपच्या ऐतिहासिक यशानंतर देशातील राजकारणात एका नव्या प्रयोगाची चर्चा सुरू झाली आहे. मतदार याद्यांचे विशेष पुनरावलोकन (एसआयआर), मतदारांच्या ओळखीची पडताळणी आणि सामाजिक गटांमध्ये नव्याने राजकीय समीकरणे उभारण्याची रणनीती यावर भाजपने भर दिला आहे. आता त्याचे पडसाद महाराष्ट्रात उमटताना दिसत आहेत. दादर येथील भाजपच्या कार्यशाळेतून दिले गेलेले संदेश हे केवळ संघटनात्मक प्रशिक्षण नव्हते.

# कापूस बियाणे विक्री १५ मेपासून

## शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष पेरा एक जूनपासून करावा, शासनाकडून आवाहन

पुणे । प्रतिनिधी

**येत्या खरिपातील कापूस बियाणे विक्रीच्या वेळापत्रक मंजुरीची तीन महिन्यांपासून कथितरित्या ठेवलेली फाइल अखेर मंत्रालयातून बाहेर आली आहे. शेतकऱ्यांना येत्या १५ मेपासून बियाणे विकण्यास शासनाने मान्यता दिली आहे. किरकोळ विक्रेते १५ मेपासून शेतकऱ्यांना कापूस बियाणे विकू शकतील. मात्र शेतकऱ्यांनी या बियाण्यांचा प्रत्यक्ष पेरा एक जूनपासून करावा, असे शासनाने म्हटले आहे. बियाणे विक्रीचे गोपनीय ठेवलेले यंदाचे वेळापत्रक जाहीर झाल्यामुळे कापूस बियाणे उत्पादक कंपन्या, विक्रेते आणि शेतकरी वर्गाचा संभ्रम दूर झाला आहे.**



कृषी मंत्रालयाचे कक्ष अधिकारी सुहास सकपाळ यांनी कृषी आयुक्त सूरज मांढरे यांना पाठविलेल्या पत्रात कापूस बियाणे उत्पादक कंपन्या १ मे ते १० मे या कालावधीत बियाणे विकावे. तसेच वितरकांनी दहा मेपासून किरकोळ विक्रेत्यांना बियाणे विक्री सुरू करावी, असे नमूद केले आहे. दरम्यान, मंत्रालयातील लालफितीच्या गोंधळामुळे यंदा कापूस बियाणे बाजारात तयार झालेला संभ्रम एचटीबीटी लागवडीसाठी पोषक ठरल्याचे विक्रेत्यांचे म्हणणे आहे. राज्यात २०१७ मध्ये कपाशीवर शेंदरी बोंड अळीचा प्रादुर्भाव झाला. त्यानंतर बियाणे विक्रीवर निर्बंध लावण्याची पद्धत कृषी विभागाने चालू केली. बाजारपेठेत कपाशीचे बियाणे वर्षभर उपलब्ध असल्यास शेतकरीदेखील कपाशीची लागवड हंगामपूर्व करतात. यातून बोंड अळीचा जीवनक्रम खंडित होत नाही. त्यामुळेच बोंड अळीचा प्रादुर्भाव होतो. रोगराई टाळण्यासाठीच आम्ही कपाशीच्या हंगामपूर्व लागवडीला दर वर्षी मनाई करतो, असे कृषी विभागाचे म्हणणे आहे. हंगामपूर्व कपाशी लागवडी रोखण्यासाठी कृषी विभाग शेतकऱ्यांना रोखू शकत नाही. त्यामुळे कपाशी बियाणे शेतकऱ्यांना हंगामपूर्व मिळू नये, अशी शक्कल लढवली जाते. त्यातूनच हंगामपूर्व बियाणे विक्रीवर बंदी आणली जाते. त्यासाठी महाराष्ट्र कापूस बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री, विक्री किमतीचे निश्चितीकरण याचे विनियमन) कायदा २००९ चा आधार कृषी विभाग घेत असतो. एका बियाणे उत्पादक कंपनीच्या व्यवस्थापकाने सांगितले, की या कायद्याचा आधार घेत कृषी आयुक्तालयातील निविष्ठा व गुणनियंत्रण विभागाचे संचालक दर वर्षी राज्यातील

▶▶ पान २ वर

### कापूस बियाणे विक्रीचे नवे वेळापत्रक

त्पादक कंपनी ते वितरक १ ते १० मे. वितरक ते किरकोळ विक्रेते १० मेनंतर. किरकोळ विक्रेते ते शेतकरी १५ मेपासून. शेतकऱ्यांकडून प्रत्यक्ष लागवड १ जूनपासून.

## पेट्रोल, डिझेल आणि गॅसचा वापर अत्यंत संयमाने करा-नरेंद्र मोदी

हैदराबाद । वृत्तसंस्था

पश्चिम आशियातील सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि. १०) देशवासीयांना पेट्रोलियम उत्पादनांचा वापर अत्यंत संयमाने करण्याचे आवाहन केले. तेलंगणामध्ये सुमारे ९,४०० कोटी रुपयांच्या विकासकामांचे उद्घाटन करताना पंतप्रधानांनी इंधन बचतीवर भर दिला. भारत मोठ्या प्रमाणावर इंधन आयात करत असल्याने सध्याच्या परिस्थितीत संयम पाळणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आज पेट्रोल, गॅस आणि डिझेल यांसारख्या गोष्टींचा अत्यंत संयमाने वापर करणे ही काळाची गरज आहे. आपल्याला आयात केलेली पेट्रोलियम उत्पादने केवळ आवश्यकतेनुसारच वापरावी लागतील. यामुळे केवळ परकीय चलनच वाचणार नाही, तर युद्धाच्या प्रतिकूल परिणामांची तीव्रताही कमी होईल, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. पंतप्रधानांनी अक्षय आणि पर्यायी ऊर्जेच्या क्षेत्रात भारताने केलेल्या प्रगतीचाही उल्लेख केला. सौर ऊर्जा निर्मितीत भारत जगातील आघाडीच्या देशांपैकी एक

▶▶ पान २ वर

## रुपाली चाकणकरांची ६ तास एसआयटी चौकशी!

### आएपीएस तेजस्वी सातपुतेंकडून कसून तपास

नाशिक । प्रतिनिधी

राज्याला हादरवरुन सोडणाऱ्या नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात राष्ट्रवादीच्या माजी प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर यांची रविवारी कसून चौकशी करण्यात आली. तब्बल ७ तास एसआयटीकडून त्यांची चौकशी सुरू होती. त्यामुळे, एसआयटीने रुपाली चाकणकर यांना नेमके काय प्रश्न विचारले, नेमके कोणत्या प्रकारची चौकशी झाली, याची उत्सुकता सगळ्यांनाच आहे.

अशोक खरात प्रकरणात एसआयटी पथकाकडून अद्यापही चौकशी सुरू असून



वेगवेगळ्या गुन्ह्यात पोलिसांनी आरोपी अशोक खरातची पोलीस कोठडी वाढवून घेतली आहे. त्यातच, यापूर्वी रुपाली चाकणकर यांच्या बहिणीची एसआयटीने चौकशी केली असून पतसंस्थेतील आर्थिक व्यवहारासंदर्भात ही चौकशी झाल्याची माहिती आहे. आता, प्रत्यक्ष रुपाली चाकणकर यांची देखील चौकशी झाली. चाकणकर यांनी एसआयटी पथकापासून बाहेर आल्यानंतर माध्यमांशी संवाद साधला. पोलिसांना जे आवश्यक होते त्यात मी सर्व सहकार्य केले आहे, एसयटी तपासात मी तपास यंत्रणांसोबत सविस्तरपणे बोलेले. माझ्या चौकशी संदर्भात सविस्तर अहवाल तुमच्यापर्यंत

▶▶ पान २ वर

### मुख्यमंत्री विजय यांच्याकडून पहिल्याच दिवशी तीन आश्वसनांची पुर्तता

## तामिळनाडूत २०० युनिट वीज मोफत



चेन्नई । प्रतिनिधी

सी. जोसेफ विजय (थलपथी विजय) यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेताच आपल्या जाहीरनाम्यातील महत्त्वाच्या आश्वासनांची पूर्तता करण्यास सुरुवात केली आहे. सत्तेवर येताच पहिल्याच दिवशी विजय यांनी तीन मोठ्या फाईल्सवर स्वाक्षरी करून जनतेला मोठा दिलासा दिला आहे. निवडणुकीपूर्वी दिलेले सर्वात मोठे आश्वासन पूर्ण करत,

▶▶ पान २ वर

### शपथविधीला राहुल गांधी यांची उपस्थिती

तमिळगा वेत्री कळघम (टीव्हीके) पक्षाचे अध्यक्ष आणि अभिनेते सी. जोसेफ विजय यांनी रविवारी तामिळनाडूचे ९ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. यामुळे राज्यातील दोन प्रमुख द्रविड पक्ष डिएमके आणि एआयएडिएमके यांच्यातील, जवळपास सहा दशकांपासून चालत आलेली आलटून-पालटून सत्ता संपुष्टात आली. राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ आर्लेकर यांनी त्यांना पदाची शपथ दिली. या शपथविधी सोहळ्याला लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे खासदार राहुल गांधी उपस्थीत होते. वियज यांच्यासोबत नऊ मंत्र्यांनी शपथ घेतली.

## सोशल मिडियावरील त्या विधानावरून सरन्यायाधीश संतापले



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**सोशल मीडियावर आपल्या नावाचा वापर करून पसरवण्यात येत असलेल्या एका चुकीच्या विधानाचा सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी तीव्र शब्दांत निषेध केला आहे. अत्यंत दुर्मिळ अशा या थेट प्रतिक्रियेत, सरन्यायाधीशांनी ते विधान पूर्णपणे नाकारले आहे.**

सोशल मीडियावरील एका अकाउंटने सरन्यायाधीशांच्या नावावर एक विधान खोट्या पद्धतीने खपवले होते. ''जर एखाद्या समाजाने आपल्यामधून आयएएस, आयपीएस, सरन्यायाधीश, राष्ट्रपती आणि पंतप्रधान दिलेले असतानाही तो समाज स्वतःला शोषित समजत असेल, तर दोष ब्राह्मणांचा नाही तर त्यांच्या स्वतःच्या मानसिकतेचा आहे.'' असे हे विधान आहे. याबाबत पीटीआयला दिलेल्या निवेदनात सरन्यायाधीशांनी म्हटले आहे की, ''एक बनावट विधान तयार करणे आणि ते देशातील सर्वोच्च न्यायिक पदाच्या नावावर खपवणे, हा अत्यंत अप्रामाणिकपणा, जाणूनबुजून केलेली सामाजिक प्रक्षोभकता आणि घटनात्मक मूल्यांचा अवमान आहे. हा ''घृणास्पद, निर्लज्ज आणि खोडसाळ प्रकार आहे, असे ते म्हणाले. ''असे बेजबाबदार वर्तन न्यायपालिकेवरील जनतेचा विश्वास आणि कायद्याच्या राज्याच्या मूळावरच घाला घालते.'' हे दावे पूर्णपणे बनावट असल्याचे स्पष्ट करताना निवेदनात म्हटले आहे की, ''हे आरोप पूर्णपणे निराधार, द्वेषपूर्ण

▶▶ पान २ वर

### नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्गाचा नवा आराखडा व्हायरल

पुणे । प्रतिनिधी

नागपूर-गोवा या शक्तिपीठ मार्गाच्या नवीन रूटप्रमाणे निघणारी अधिसूचना ५ मे रोजीच व्हायरल झालेली आहे. राजपत्रात प्रसिद्ध होण्यापूर्वीच ही अधिसूचना बाहेर आली असून नवीन आराखड्यात नीरा नरसिंहपूर व शिखर शिंगणापूर ही देवस्थाने मार्गालगत आली आहेत. नव्या मार्गात वैराग, माण खटाव या दुष्काळी पट्ट्याचा

▶▶ पान २ वर

## मातीच्या ढिगाऱ्याखाली दबून वडिलासह दोन मुलांचा मृत्यू

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये मन सुन्न करणारी घटना घडली. विहिरीच्या कामादरम्यान ढिगाऱ्याखाली दबून वडील आणि दोन मुलांचा दुर्दैवी मृत्यू झाला. सिल्लोड तालुक्यातील धानोरा गावात ही घटना घडली. एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाल्यामुळे हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यातील

▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### पंतप्रधान मोदी यांच्या कार्यक्रम स्थळाजवळ स्फोटके

बंगळूरः रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बंगळूर दौऱ्यापूर्वी बंगळूरच्या बाहेरील एका कार्यक्रमाच्या ठिकाणी किमान दोन जिलेटीनच्या कांड्या सापडल्याने सुरक्षेत भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिसांनी सखोल तपास सुरू केला आहे. पंतप्रधानांचा कार्यक्रम ज्या मुख्य ठिकाणी होणार होता, त्या ठिकाणापासून सुमारे ३ किलोमीटर अंतरावर, कागलीपुरा जवळील एका आश्रमाजवळ ही स्फोटके सापडली. पोलिसांच्या निवेदनानुसार, पंतप्रधान मोदींच्या आगमनापूर्वी करण्यात आलेल्या नियमित सुरक्षा तपासणीदरम्यान हे संशयास्पद साहित्य सापडले. पोलिसांनी सांगितले, ''रविवारी सकाळी, पंतप्रधानांच्या आगमनापूर्वी, तपासणीदरम्यान, पंतप्रधान मोदी ज्या मुख्य ठिकाणी येणार होते, त्या ठिकाणापासून सुमारे ३ किलोमीटर अंतरावर असलेल्या पदपथाच्या कडेला दोन जिलेटीनच्या कांड्या सापडल्या.'' या वस्तू सापडल्यानंतर सुरक्षा यंत्रणांनी तात्काळ परिसर सील केला, तर बॉम्ब निकामी करणारे आणि फॉरेन्सिक पथके तपासणीसाठी घटनास्थळी रवाना झाली.

### मतीन पटेल यांच्या घर आणि कार्यालयावर बुलडोझर?

संभाजीनगरः नाशिकच्या कंपनीतील धर्मांतर प्रकरणातील मुख्य सूत्रधार निदा खानला आश्रय देणारे एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल यांच्यावरही सहआरोपी म्हणून कारवाई करण्यात येणार आहे. या प्रकरणात निदा खानला पोलिसांनी छत्रपती संभाजीनगरमधून अटक केली होती. या प्रकरणात आता पटेल यांच्या घरावर आणि कार्यालयावर पालिकेने कारवाईची नोटिस चिकटवली आहे. त्यामुळे त्यांच्या घर आणि कार्यालयावर बुलडोझर फिरणार का? असा सवाल केला जातो आहे. कारण मतीन यांच्या घरावर आणि कार्यालयावर छत्रपती संभाजीनगर महापालिकेने नोटीस चिटकवली आहे. नगरसेवक मतीन पटेल यांनी या नोटीसला तीन दिवसात समाधानकारक उत्तर न दिल्यास आता त्यांच्या घरावर बुलडोझर फिरणार असल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळे आता ही कारवाई करण्यात येणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### दिल्लीत आत्मघाती हल्ल्याचा कट!

दिल्लीः राजधानी दिल्लीत हायअलर्ट जारी करण्यात आला आहे. गुप्तचर यंत्रणांना मिळालेल्या काही संवेदनशील माहितीनंतर दिल्ली पोलिस आणि अन्य सुरक्षा यंत्रणा सतर्क झालेल्या आहेत. तसेच दिल्लीतील अनेक संवेदनशील भागातील सुरक्षा वाढविण्यात आली आहे. भाजप मुख्यालय, सरकारी कार्यालये, गर्दीच्या ठिकाणी दहशतवादी हल्ले होऊ शकतात, अशी शक्यता वर्तविण्यात आली आहे. एजन्सींना संशय आहे की, दीनदयाल उपाध्याय मार्गावरील कार्यालयांना आत्मघाती हल्ले, कार बॉम्बस्फोट, गोळीबार किंवा आयईडीद्वारे लक्ष्य केले जाऊ शकते. कोणताही धोका टाळण्यासाठी सुरक्षा दलांनी पाळत आणि प्रतिबंधात्मक उपाय वाढवले आहेत. पोलिस आणि सुरक्षा दलांनी अतिरिक्त जवानांची तैनाती, तपासणी आणि सीसीटीव्ही पाळत वाढवली आहे. संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी बॅरिकेडिंग आणि वाहनांची रँडम तपासणी करण्यासोबतच सुरक्षा एजन्सी कोणत्याही संभाव्य धोक्याला प्रतिबंध घालण्यासाठी समन्वयाने काम करत आहेत.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०९ मे २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: ७१.५० क्विंटल | १,९१० | २,६५० | २,३२९ |
| ज्वारी/हायब्रिड: १५७.५० क्विंटल | १,७०० | ४,२३१ | २,४३१ |
| मका/लोकल: ३४.५० क्विंटल | १,४८२ | १,८१६ | १,६६९ |
| तूर : ५.०० क्विंटल | ६,००० | ६,५०१ | ६,२५० |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: ६८.०० क्विंटल | २,००० | ३,५०० | २,३०० |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: २०.०० क्विंटल | ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |

# जिल्हा परिषदेने पाजले बाराशे गावांना पाणी

## जलजीवन मिशन अंतर्गत झालेल्या कामात कोट्यावधिंच्या घोटाळ्याची चर्चा

बीड । प्रतिनिधी

**केंद्र आणि राज्य सरकारच्या संयुक्त निधीमधून राज्यभरामध्ये जलजीवन मिशन अंतर्गत अनेक गावांसाठी पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आला. त्यामध्ये बीड जिल्ह्यातील जवळपास बाराशे पेक्षा अधिक गावात ही योजना मंजूर झाली. मात्र अनेक कंत्राटदाराने अर्धवट कामे पूर्ण केली. आजही ही गावी तहानलेलीच आहेत. यातील अनेक गावांना पाण्याचे स्रोत नसतानाही पाईपलाईन टाकून गुत्तेदाराने अधिकाऱ्यांच्या कृपेने बिले उचलली आहेत. महसूल घोटाळ्यापेक्षाही मोठा घोटाळा जिल्हा परिषदेच्या जलजीवन मिशनमध्ये झाला असल्याची चर्चा आता पुढे येत आहे.**




केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या माध्यमातून केंद्र शासनाचा महत्त्वकांक्षी प्रकल्प म्हणून हर घर जल या योजनेअंतर्गत जलजीवन मिशन सुरू करण्यात आली. ज्या गावातील महिलांना डोक्यावर हंडा घेऊन पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावे लागत होती त्या महिलांच्या डोक्यावरील पाण्याचा हंडा कमी व्हावा म्हणून त्या गावांमध्ये ही योजना राबवण्याचे ठरले. त्यानुसार गावांची निवडही करण्यात आली. बीड जिल्ह्यातील जवळपास बाराशे ते पंधराशे गावांमध्ये ही योजना मंजूर करण्यात आली. एक योजना पाच ते दहा कोटीच्या आसपास आहे. विशेषतः या कामांमध्ये अनेक त्रुटी आहेत, परंतु अधिकारी आणि संबंधित गुत्तेदाराने संगणमत करून या योजनेचे पूर्णपणे वाटोळे केले असल्याचे आता बोलले जात आहे. ही योजना पूर्ण करण्यासाठी प्रारंभी पाण्याचा स्रोत पाहणे गरजेचे असते, परंतु पाण्याचा स्रोत न पाहता केवळ पाण्याची टाकी बांधून गावात पाईपलाईन करत ही बिले उचलली गेली आहेत. २०२० ते २०२४ जिल्हा परिषदेचे तत्कालीन सिइओ अजित पवार, अविनाश पाठक यांच्या

▶▶ पान २ वर

### पवार, पाठक यांचा कार्यकाळ

बीड जिल्हा परिषदेचे २०२० पर्यंत सिइओ म्हणून अजित पवार होते. २४ पूर्वी जे आता पोलीस कोठडीमध्ये आहेत ते अविनाश पाठक जिल्हा परिषदेचे सिइओ होते. याच कार्यक्रमांमध्ये जलजीवन मिशन अंतर्गत अनेक कंत्राटदारांची बिले अदा केली गेली. केवळ खालच्या कर्मचाऱ्यांनी दिलेल्या टिपणीवर काम न होता ही बिले अदा केल्याचे बोलले जात आहे.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. ११ मे २०२६


## थोडक्यात

### परळीत १५ मे पासून राष्ट्रनिर्माण संस्कार शिबिराची सुरुवात

परळी । प्रतिनिधी

शालेय वयोगट ११ ते १५ या वयोगटातील मुलं-मुली यांना राष्ट्रीय मूल्यांनी व सुदृढ शरीर परिपूर्ण करण्यासाठी दि . १५ मे ते १९ मे २०२६ या दरम्यान, परळी भिमजयंती महोत्सव समिती व सम्राट अशोक विचार मंच यांच्या वतीने *राष्ट्रनिर्माण संस्कार शिबीर* आयोजित करण्यात आले आहे.

सदरील शिबीर सर्व भारतीय विद्यार्थी- विद्यार्थीनी यांना खुले असून या शिबीरात शारिरिक व बौद्धिक अशा दोन्ही प्रकारे शिक्षण व प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सदरील संस्कार शिबीर दोन सत्रात चालणार असून पहिले सत्र सकाळी ६:०० ते ८:०० तर दुसरे सत्र सांय. ५:०० ते ७:०० असे असणार आहे. या पाच दिवस चालणार्या शिबीरात विविध क्षेत्रातील तज्ञ मार्गदर्शक येणार आहेत. तरी या राष्ट्रनिर्माण संस्कार शिबिरात* भाग घेऊ इच्छिणार्या विद्यार्थी- विद्यार्थीतीनी प्रा विलास रोडे-९४२३७१४४६४, डॉ सिद्धार्थ जगतकर-८६०५९१०५६२, आकाश साळवे सर-७७०९४६६२४७ व प्रा दासू वाघमारे-८७८८०२७२२९ यांचे कडे नाव नोंदणी करावी, अशी सूचना करण्यात आली आहे.

### अक्षता मुंडे हिचे ९४.४०% टक्के गुण घेऊन दहावी परिक्षेत घवघवीत यश

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

कृषी उत्पन्न बाजार समितीचे सहसचिव गोविंद मुंडे यांची कन्या फाऊंडेशन स्कुलची विद्यार्थ्यांनी कु.अक्षता गोविंद मुंडे हिने ९४.४०% टक्के गुण घेऊन दहावी परिक्षेत घवघवीत यश यश संपादन केले आहे. लहानपणापासुनच जिद्दी असलेली आणी चिकाटी व सातत्याने अभ्यासामध्ये प्रगती करणारी कु. अक्षता हिने नुकत्याच लागलेल्या दहाविच्या परिक्षा निकालामध्ये ९४.४०% गुण मिळवुन आपल्या दैदित्यमान यशाने परळी वैजनाथ तालुक्यात अक्षताने सन्मान राखुन मानाचा तुरा रोवला आहे. तिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेत निकाल आज जाहीर झाला आहे. त्यामध्ये परळी वैजनाथ तालुक्यातील मौजे जिरेवाडी येथील कु.अक्षता गोविंद मुंडे हिने हीने ५०० पैकी ४६२+१० गुण घेऊन ९४.४०% टक्के गुण घेऊन विशेष प्रविण्य मिळवून ऊतीर्ण झाली आहे. रात्रंदिवस केलेली मेहनत आणि शिक्षक वृदांवन, आई वडील यांचे मिळालेले मार्गदर्शन यामुळे आपण यश संपादन केल्याचे कु.अक्षता गोविंद मुंडे हिने सांगितले. तसेच इंग्रजीत ८९, संस्कृत ९३, मराठी ९४, गणित ९४, सायन्स ९२ व सोशल सायन्स ८५ मध्ये मार्क घेतले आहेत. कु.अक्षता गोविंद मुंडे हीने शिक्षणात ध्येयवेडी, बालवयापासुनच आपल्या आईवडीलांच्या कष्टाची जाण ठेवुन शाळेच्या प्रत्येक कार्यक्रमामध्ये हिररीने सहभाग घेवुन यश खेचुन आणत होती.शिक्षणच माणसाला तारु शकते ही खुनगाठ मनाशी बांधुन समाजाप्रती जे देनं लागते या सामाजीक भावनेने प्रेरीत झालेली अक्षता मोठ्या पदावर आरुढ होवुन सेवाभावी कार्य करन्याचे स्वप्न ऊराशी बाळगुन अभ्यास करत होती.या तिच्या जिद्द व चिकाटीला अखेर यश येवुन नुकत्याच लागलेल्या दहावीच्या परिक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. या यशाने तिच्या आईवडील आणी भावडांचा आनंद गगनात मावेनासा झाला. कु.अक्षता गोविंद मुंडे हीने मिळविलेल्या या यशाबद्दल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुर्यभान नाना मुंडे, सचिव रामदासी डॉं. प्रा.बालाजी मुंडे, नवनाथ नागरगोजे, दिलीप नागरगोजे, पत्रकार महादेव गित्ते आदींनी अभिनंदन केले आहे.

# शकील यांच्या कार्यपद्धतीवर जिल्ह्यातील कर्मचारी नाउमेद

## कर्मचाऱ्यांशी अरेरावी उद्धटपणा अशा ढीगभर तक्रारी मुख्य कार्यालयाकडे: कारवाईची मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेत महाराष्ट्र शासन ग्रामीण जीवनोन्नती अभियान या उमेद संस्था अंतर्गत बीड जिल्ह्यातील महिला बचत गट त्यांच्या उत्पादनाला बाजारपेठ हा उपक्रम उमेदवार जातो मात्र या कार्यालयातील कर्मचारी असलेले शेख शकील यांची मात्र कार्यालयीन कर्मचाऱ्यांना उद्धटपणाची वागणूक यामुळे या कार्यालयातील अनेक कर्मचाऱ्यांनी मुख्य कार्यालयाकडे अनेक तक्रारी केल्या चौकशी झाली मात्र आपले राजकीय संबंध असल्याचे भासवुन चौकशीकडे दुर्लक्ष केले जात असल्याने बीड जिल्ह्यातील उमेद कार्यालयातील कर्मचारी मात्र नाउमेद होत आज त्याचा दैनंदिन कामकाजावर परिणाम होत आहे कार्यालयातील शिस्तता बिघडत जात असल्यामुळे शखील यांना या ठिकाणाहून हलवण्यात यावे असे तक्रारीवरून दिसून येते.



महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत (उमेद) बीडचे प्रभारी जिल्हा अभियान व्यवस्थापक शकील सुभान शेख यांच्या कार्यपद्धतीविरुद्ध कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून त्यांच्याविरुद्ध भ्रष्टाचाराचे आरोप, महिला कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन आणि अधिकाराचा गैरवापर केल्याच्या तक्रारींचा ढीग साचला असून, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याने कर्मचाऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे.

गंभीर आरोपांची मालिका

उपलब्ध माहितीनुसार, शकील शेख यांच्यावर कर्मचाऱ्यांनी अत्यंत गंभीर स्वरूपाचे आरोप केले आहेत:महिला कर्मचाऱ्यांची छळवणूक: महिला आयोगाकडे अनेक महिला कर्मचाऱ्यांनी तक्रारी दाखल केल्या असून, शेख हे कामाच्या नावाखाली मानसिक त्रास देत असल्याचा आरोप अर्जात करण्यात आला आहे.

धार्मिक भेदभाव:अपमानास्पद वागणूक: "तुमची लायकी माझ्या घरात पाणी भरण्याचीही नाही," अशा अर्वाच्य भाषेत कनिष्ठ कर्मचाऱ्यांचा अपमान करणे आणि व्हिडिओ कॉन्फरन्सिंग दरम्यान अश्लील शब्दांचा वापर करणे, अशा तक्रारी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे प्राप्त झाल्या आहेत.

दहशतीचे वातावरण: सध्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे माझे नातेवाईक आहेत, अशी भीती दाखवून शेख कर्मचाऱ्यांवर दबाव टाकत असल्याचेही अर्जात नमूद करण्यात आले आहे. संबंधित व्यवस्थापक शैक्षके यांच्याविरुद्ध साधारणपणे १५ ते २० तक्रारी विविध स्तरावर करण्यात आले आहे तक्रारीची चौकशी अद्याप पर्यंत असून संबंधित विवाह करून कोणतीही स्पष्ट भूमिका घेण्यात आलेली नाही त्यामुळे कर्मचारी भीतीच्या वातावरणात असल्याचे दिसते.

### चौकशी समितीचा निष्कर्ष तरीही कारवाई शून्य?

विशेष म्हणजे, या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीनेही शेख यांच्या कार्यपद्धतीवर ताशेरे ओढले आहेत. "शेख यांचे जिल्हा व तालुका स्तरावरील कर्मचाऱ्यांशी संबंध सौदार्हपूर्ण नाहीत आणि त्यांच्या कामकाजाचा अभियानाच्या अंमलबजावणीवर विपरीत परिणाम होत आहे," असा स्पष्ट निष्कर्ष चौकशी समितीने नोंदवला आहे. तरीही संबंधित विभागाकडून शेख यांना पाठीशी घातले जात असल्याची भावना कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे.

### आता थेट करो या मरोची भूमिका

**या सततच्या जाचामुळे काही कर्मचाऱ्यांनी आत्महत्येचा इशाराही दिला आहे. तक्रारदार कर्मचाऱ्यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री आणि विभागीय आयुक्तांना निवेदने पाठवून शेख यांची तातडीने जिल्ह्यातून बदली करण्याची आणि त्यांची सखोल चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. आता या प्रकरणाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले असून, प्रशासन अशा वादग्रस्त अधिकाऱ्याला पाठीशी घालणार की पीडित कर्मचाऱ्यांना न्याय देणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.**

# विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार करिअरची निवड होणे आवश्यक : प्रो. डॉ. सतीश दांडगे

बीड । प्रतिनिधी

**विद्यार्थ्यांना समजून घेऊन पालक व शिक्षकांनी त्यांच्या करिअरबाबत योग्य मार्गदर्शन करण्याची आज मोठी गरज आहे. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये वेगळी क्षमता असते, ती ओळखून त्याला योग्य क्षेत्राची निवड करून देणे महत्त्वाचे आहे. पालकांनी मुलांवर केवळ अपेक्षांचे ओझे न टाकता त्यांच्या आवडीनुसार त्यांना प्रोत्साहन दिल्यास ते जीवनात निश्चितच मोठे यश संपादन करू शकतात, असे प्रतिपादन प्रो.डॉ.सतीश दांडगे यांनी केले.**



देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी इंग्लिश स्कूल व तुलसी कला, विज्ञान व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय यांच्या वतीने दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा तुलसी समूहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे, प्रा. संजय खाडे, प्राचार्या उमा जगतकर, प्राचार्य प्रा. प्रकाश ढोकणे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रा. प्रदीप रोडे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, क्षेत्र कोणतेही असो, त्या क्षेत्रातील सर्वोच्च यश संपादन करण्याचे ध्येय विद्यार्थ्यांनी ठेवले पाहिजे. मोबाईल व वेळेचा सदुपयोग करून मेहनत, वाचन आणि कौशल्य विकासावर भर दिल्यास यश निश्चित मिळते, असे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी स्वयंप्रकाशित होऊन स्वतःचे करिअर स्वतः घडवावे. जगात बदल घडवायचा असेल तर प्रथम स्वतःमध्ये बदल घडवावा लागतो, असेही त्यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी प्रा. संजय खाडे यांनी विद्यार्थ्यांना बारावीनंतरच्या विविध अभ्यासक्रम, करिअरच्या संधी तसेच गएए आणि छएएढ सारख्या स्पर्धा परीक्षांविषयी मार्गदर्शन केले. प्राचार्य प्रकाश ढोकणे यांनी महाविद्यालयाच्या उज्वल निकालाचा गौरव केला व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. यानंतर दहावी आणि बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ, तुलसी समूहाचे पुस्तक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सय्यद सिद्धीक यांनी केले. याप्रसंगी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## पान ६ वरून...

### श्री.शनैश्वर जन्मोत्सव सोहळ्या

करून करण्यात आले. वैद्यनाथ मंदिराच्या प्रांगणात श्री शनी मंदिर समोर शोभा यात्रेचे आगमन झाल्यानंतर महिला भगिनींनी सुंदर रिंगण करून टाळ, मृदंग आणि ढोल ताशाच्या तालावर गुरुराज माऊलीचा जयघोष केला. ही शोभायात्रा यशस्वी करण्यासाठी श्री शनैश्वर देवस्थान कमिटी व तेली समाजाच्या तरुण मंडळी, शनी भक्त, महिला मंडळ, ज्येष्ठ मंडळींनीही प्रयत्न केला. तर नगरसेवक जयराज देशमुख यांच्या वतीने शोभायात्रेत सहभागी भक्तांना थंडपेयाचे वाटप करण्यात आले.

अखंड शिवनाम सप्ताह व परमरहस्य पारायणाची सुरुवात

शनिवारी शोभायात्रेनंतर अखंड शिवनाम सप्ताह व ग्रंथराज परमरहस्य पारायण सोहळ्यास रविवारी (ता.१०) सुरुवात झाली. पारायणास महिला व पुरुष भक्तांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. हे पुढील सात दिवस चालणार आहे. दरम्यान श्री.शनैश्वर जन्मोत्सव सोहळ्यात गेल्या १५ वर्षांपासून रक्तदान शिबीर आयोजित करण्यात येते. शिबीर आयोजनाबदूल स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रक्तपेढी च्या वतीने अनेकवेळा सन्मानित केले आहे. यंदाही रक्तदान शिबीराचे आयोजन छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीदिनी गुरुवारी (ता.१४) सकाळी ८ ते १२ यावेळेत श्री शनी मंदिरात करण्यात आले आहे.शिबीरात सहभागी होवून युवकांनी आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### आदित्य नर्सिंग महाविद्यालयाचा

सत्रांत आपला दबदबा निर्माण केला आहे. सातव्या सत्रात प्रदिप गोकुळ भांगे याने प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय रचना दिपक अवसरमोल, तृतीय सुरज शाहु घुले. ६ व्या सत्रामध्ये प्रथम क्रमांक साक्षी माने, द्वितीय प्रथमेश निकाळजे, तृतीय आंचल थाटे इतर विद्यार्थ्यांनीही उच्चांकी गुण मिळवत यश प्राप्त केले आहे. यशस्वी विद्यार्थिनी रचना अवसरमोल हिने आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांच्या पाठिंब्यामुळेच हे यश शक्य झाले. नर्सिंग हे केवळ शिक्षण नसून सेवा आणि समर्पणाची भावना आहे, हे आम्हाला येथे शिकायला मिळाले.

### मातृत्व सप्ताहा निमित्त

जाणार आहे. अधिक माहितीसाठी किंवा नाव नोंदणीसाठी ९४०४४३९८४५ या क्रमांकावर संपर्क साधावा किंवा थेट जालना रोडवरील भोपळे हॉस्पिटलमध्ये उपस्थित राहावे, असे आवाहन रुग्णालय प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका

शौचाच्या वेळी रक्त पडणे, तीव्र वेदना होणे, खाज येणे किंवा गाठ जाणवणे अशी लक्षणे असल्यास महिलांनी तातडीने तपासणी करून घ्यावी, असे आवाहन डॉ. शितल भोपळे यांनी केले आहे.

### शैक्षणिक कर्ज मंजूर करूनही

एज्युकेशन लोन स्कीम'चा दाखला देण्यात आला. त्यानुसार चार लाख रुपयांपर्यंतच्या शैक्षणिक कर्जासाठी कोणतीही तारण मालमत्ता किंवा अतिरिक्त जामीनदार घेण्याची आवश्यकता नसल्याचे आयोगासमोर मांडण्यात आले. आयोगानेही ही बाब ग्राह्य धरत बँकेने जामीनदाराची अट घालणे अयोग्य असल्याचे स्पष्ट केले. तसेच विद्यार्थ्याने एसईबीसी प्रवर्गाची माहिती लपविल्याचा बँकेचा दावा आयोगाने फेटाळून लावला. कर्ज मंजुरी आदेशातच विद्यार्थी एसईबीसी प्रवर्गातील असल्याचा उल्लेख असल्याने बँकेचा आक्षेप पुराव्याअभावी ग्राह्य धरता येत नसल्याचे आयोगाने नमूद केले. या सर्व बाबी लक्षात घेऊन बीड जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष हरीश अडके, सदस्या सतिका शिरदे आणि संगिनी राहुल पोळ यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. तक्रारदाराच्यावतीने ॲड.एस. आर. कुंभार, ॲड. नारायण सिरसट, ॲड.विकास मिसाळ, ॲड.बालाजी घुमरे, ॲड.दीपक कुलकर्णी, ॲड.उदय दराडे, अक्षय सिरसट यांनी काम पाहिले. दरम्यान, आयोगाने महाराष्ट्र ग्रामीण बँकेस ३० दिवसांत मंजूर कर्जाची रक्कम वितरित करण्याचे आदेश दिले असून अन्यथा त्या रकमेवर ९ टक्के व्याज आकारण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच मानसिक त्रास व तक्रार खर्चापोटी १० हजार रुपये ४५ दिवसांत देण्याचेही आदेश आयोगाने दिले आहेत.

**विद्यार्थ्याच्या शिक्षणावर परिणाम**

आयोगाने आदेशात म्हटले आहे की, बँकेने कर्ज प्रक्रिया शुल्क स्वीकारून कर्ज मंजुरी आदेश दिल्यानंतरही कर्ज वितरित न करणे ही सेवेतील कसूर ठरते. या विलंबामुळे विद्यार्थ्याच्या शिक्षणावर परिणाम झाला असून मानसिक त्रासही सहन करावा लागला.

### अखेर ऊस उत्पादक

टन प्रमाणे रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यास सुरुवात केलेली आहे. जाहीर केलेल्या २९५०/- प्रति टन दराप्रमाणे उर्वरीत ११५०/प्रति टन रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात दि.२५ मे पर्यंत जमा करण्याचं लेखी अभिवचन कारखाना प्रशासनाकडून जनरल मॅनेजर एस.व्ही सोळंके यांनी शनिवारी रात्री उशिरा आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांना दिलं आहे. यावेळी ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समितीचे नेते ॲड. अजय बुरांडे, ॲड.श्रीनिवास मुंडे, श्रीराम बडे, विनायकराव मुंडे, अरुण महाराज शिंदे, देविदास कराड, धोंडीबा दिवटे, अशोक शिंदे, दत्तात्रय तिडके, प्रभाकर मुंडे, मनोहर मुंडे, बिभीषण गित्ते,अविनाश मुंडे, शरद गित्ते सूर्यकांत तिडके यांच्या सह अनेक शेतकरी आंदोलक उपस्थित होते.

या आंदोलनाची धास्ती घेऊन पवारवाडी व ट्वेंटी २० सायखेडा या दोन्ही कारखान्याकडून शेतकऱ्यांच्या खात्यात जाहीर केलेल्या दराप्रमाणे ऊस बिल रक्कम जमा जमा करण्यास सुरुवात झालेली आहे. तसं या कारखान्यांनी शेतकरी संघर्ष समिती ला कळवलं आहे. शेतकऱ्यांच्या हक्काचे घामाचे पैसे मिळवण्यासाठी आंदोलन करावं लागतंय हीच मुळात मोठी शोकांतिका आहे. बळीराजा न ऊन वारा पाऊस, सुलतानी अस्मानी संकटाशी सामना करत रात्र रात्र जागून पिकविलेल्या पिकाचा मोबदला मिळवण्यासाठी एवढा अट्टाहास आणि लढा कराव लागतंय हे दुर्दैवी आहे. इथून पुढच्या काळात सुद्धा शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आवाज उठवण्यासाठी शेतकऱ्याच्या एकजुटीची वज्रमूठ अशीच राहू द्या. असे आवाहन शेतकरी संघर्ष समितीने केलं आहे.

### बर्दापूर येथे शेतात

या घटनेत जनावरांसाठी साठवून ठेवलेला चारा पूर्णपणे जळून गेला असून शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. "आता मी संकटात सापडलो आहे, जनावरांना काय खाऊ घालू?" अशी हळहळ व्यक्त करत संतोष बजाज यांनी आपली व्यथा मांडली. आग इतकी भीषण होती की पाईपलाईन, झाडे तसेच इतर शेती उपयोगी साहित्याचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. या दुर्घटनेमुळे शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान झाल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. संबंधित प्रशासनाने पंचनामा करून नुकसानग्रस्त शेतकऱ्याला तात्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

# श्री नारायण माध्यमिक विद्यालयाची यशाची परंपरा कायम; शाळेचा निकाल ७७.७७ टक्के

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील आहेर चिंचोली येथील श्री नारायण मा. व उ. मा. विद्यालयाचा दहावी बोर्ड परीक्षेत प्रत्येक वर्षी प्रमाणे यावर्षी निकालाची परंपरा कायम ठेवलेली आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत श्री नारायण माध्यमिक विद्यालयातील एकूण नियमित ९९ विद्यार्थी परीक्षेला बसले होते पैकी विशेष प्राविण्यासह १३ आणि फर्स्ट डिव्हिजन मध्ये ३२, द्वितीय श्रेणी ३२ अशाप्रकारे शाळेचा निकाल ७७.७७ टक्के लागलेला आहे.

शाळेमध्ये प्रथम येण्याचा मान चव्हाण आदर्श शिवाजी ८६.४० क्रमाने दुसरा बहिर आदर्श भारत ८४.६०आणि शाळेतून तिसरी आलेली विद्यार्थिनी रकटे रिद्धी रमेश ८३., चौथा क्रमांक निर्मळ कल्याणी श्रीराम ८२ टक्के मिळवले आहेत.

संस्थेचे अध्यक्ष माननीय महादेवराव काळे (अण्णा), प्राचार्य तथा सचिव श्री अमोल काळे यांनी उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केलेले आहे. मुख्याध्यापक अमोल काळे सर यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे अथक मार्गदर्शन आणि पालकांचा सततचा पाठिंबा यामुळेच हा यशस्वी निकाल शक्य झाला आहे. आम्ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शैक्षणिक गुणवत्तेसाठी सदैव कटिबद्ध आहोत.

निकालाच्या यशस्वी साठी दहावीचे वर्गशिक्षक श्री शेख अश्फाक अहमद तसेच श्री करपे एस .ए., श्री रकटे बी. आर, श्री इनकर बी. जे, प्राध्यापक अशोक घरत सर, प्रा. मस्के जी. बी, प्रा. पौळ डी.बी, श्रीमती काळे मॅडम, श्रीमती भुतावळे मॅडम, श्रीमती मस्के मॅडम, श्रीमती जगताप मॅडम, प्रा.मुरमुडे ए .एन, श्री चौधरी पी. बी यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभलेले आहे. परिसरातील ग्रामस्थ , शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# प्रगती विद्यालयाचा एस एस सी बोर्ड परीक्षेचा १०० टक्के निकालाची परंपरा कायम

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील अतिशय अल्पकाळात नामवंत ठरलेल्या विविध स्पर्धा परीक्षेत नेहमीच राज्याच्या पटलावर असलेल्या प्रगती विद्यालय बालेपीर बीड या विद्यालयाने एसएससी बोर्ड परीक्षेत नेत्रदीपक यश संपादन केले आहे तसेच विद्यालयाचा बीड जिल्ह्यात शंभर टक्के निकाल लागलेला आहे विद्यालयातील बोर्ड परीक्षेत एकूण ८५ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी ८५ उत्तीर्ण झाले आहेत विद्यालयाचा शंभर टक्के निकाल लागलेला असून खालीलप्रमाणे विद्यार्थी १) गवते शौर्य श्रीराम ९९.४०% २) अंकुशे नंदनी विनायक ९८.८०% ३) बांगर तेजल गणेश ९८.८०% ४)मिसाळ अश्विनी भाऊसाहेब ९८.४०%५) बांगर सानिका संतोष ९८% ६)नागरगोजे ईश्वरी अंकुश ९७.४०%७) बोराडे आर्यन अनिल ९७.२०%८) नागरगोजे संकेत सखाराम ९७% ९)बडे श्रुती अशोक ९६.६०% १०) गुजर जयसिंग बाळू ९५.२०% ११) शेख अल्फिया अल्ताफ ९४.८० % १२) सानप ओम हनुमान ९४.६०% १३)केळकर समर्थ आदिनाथ ९४.४०% १४) तांदळे गीतांजली लक्ष्मण ९४.५% १५) घुगे प्रतीक्षा बाबासाहेब ९३.४०% १६) तिडके श्रुती संभाजी ९३% १७)बांगर कार्तिकी रायचंद ९२.४०% १८) घोळवे अभिजीत रामेश्वर ९२.४०% १९)खेडकर ज्ञानेश्वरी शिवाजी ९१.४०% १९) नागरेअक्षरा अभिमान ९१.२०% २०)अंदुरे दुर्गेश्वरी शरद ९०.८०% २१)दहिफळे दीपक सुखदेव ९०.८०% २२) ढाकणे अंकिता सतीश ९०.८०% २३) नागरगोजे आदित्य दत्तात्रय ९०.६% २४) मिसाळ स्वराली सोमीनाथ ९०.४०% विद्यालयाचा शंभर टक्के निकाल लागला असून विशेष प्राविण्यमध्ये ५६ विद्यार्थी ग्रेट वन मध्ये २३ विद्यार्थी सेकंड मध्ये ०५ विद्यार्थी पास मध्ये ०१ या विद्यालयाचे गुणवंत यशवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन प्रगती संस्थेचे संस्थापक माननीय रामकृष्णजी बांगर साहेब तसेच सचिव सौ सत्यभामाताई बांगर युवा नेता विजयसिंह बांगर प्रगती विद्यालयाचे मुख्याध्यापक गोपाळघरे सर कंठाळे सर शेख सर ढवळे सर घोळवे सर सानप सर जायभाय सर वाघवाले सर कदम सर चव्हाण सर अग्रवाल मॅडम नागरगोजे सर मस्के सर सर्व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक यांनी वरील सर्व गुणवंत यशवंत विद्यार्थ्यांचा अभिनंदन केले व पुढील शिक्षणात हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम

### एस एस सी परीक्षेत ९३.९९% निकाल तर ९०% पेक्षा अधिक गुण घेणारे ४७ विद्यार्थी

माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयाने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. नुकत्याच जाहीर झालेला निकाल पुढील प्रमाणे आहे. एकुण विद्यार्थी ४३८ परीक्षेस बसलेले विद्यार्थी ४३३, उत्तीर्ण विद्यार्थी ४०७, तसेच ९०% पेक्षा अधिक गुण घेतलेले विद्यार्थी ४७, विशेष प्राविण्य ९२, प्रथम श्रेणी ९९, द्वितीय श्रेणी १११, तृतीय श्रेणी ५८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

या सर्व यशाची विद्यार्थ्यांचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलुरकर, कार्यवाह डॉ हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी तथा मुख्याध्यापक चंद्रकांत मुळे सर, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे, श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, कार्यवाह अड विश्वास जोशी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, परमेश्वर आदमाने इयत्ता दहावी प्रमुख श्रीमती स्वप्ना देशपांडे, सह प्रमुख श्रीमती पल्लवी कानडे, कार्यालय प्रमुख संतोष लवडकर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# सोयाबीन, तूर अन् कांदा उत्पादकांची विमा कंपन्यांकडून 'क्रूर थट्टा'

## नेत्यांच्या दुर्लक्षामुळे शेतकरी आक्रमक, गुन्हे दाखल करण्याची मागणी!

पाटोदा । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचा बळीराजा सध्या अस्मानी आणि सुलतानी अशा दोन्ही संकटांत होरपळून निघत आहे. आधी निसर्गाने सोयाबीन आणि तुरीचे पीक हिरावून घेतले, तर आता उरली-सुरली कसर विमा कंपन्या पूर्ण करत आहेत. हप्ते भरताना गोड बोलणाऱ्या कंपन्या आता नुकसान भरपाईच्या वेळी शेतकऱ्यांना 'तारीख पे तारीख' देत असल्याने जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे. आमची तूर मातीमोल झाली, सोयाबीन काळवंडले आणि कांद्यालाही भाव मिळेना, अशा स्थितीत विमा कंपन्यांवर गुन्हे नोंदवा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.सोयाबीनचा विमा: कंपन्यांचे खिसे भरले, शेतकऱ्याची झोळी रिकामी!बीड जिल्ह्यात सोयाबीन हे मुख्य पीक आहे. मात्र, यंदा पावसाच्या अनियमिततेमुळे सोयाबीनच्या उत्पादनात मोठी घट झाली आहे. अनेक शेतकऱ्यांनी वेगवेगळ्या कंपन्यांचा विमा काढला, पण क्लेम मंजूर करताना कंपन्या तांत्रिक कारणे पुढे करत आहेत. विशेषतः 'बीड मॉडेल'च्या नावाखाली कंपन्यांनी कोट्यवधी रुपये लाटले, पण प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या खात्यात छदामही जमा झालेला नाही. फसवणूक करणाऱ्या अशा कंपन्यांवर ४२० अंतर्गत गुन्हे नोंदवण्याची मागणी आता गावोगावी होत आहे.तूर आणि कांदा उत्पादक वारंवार वाऱ्यावर!नवीन तूर येईल आणि परिस्थिती सुधारेल ही आशा आता मावळली आहे. तुरीच्या पिकाचे पंचनामे करण्यात विमा कंपन्यांनी मोठी चालढकल केली. दुसरीकडे, कांदा उत्पादक शेतकऱ्यांचीही अवस्था दयनीय आहे. एकीकडे बाजारात भाव नाही आणि दुसरीकडे निसर्गाच्या लहरीपणामुळे होणाऱ्या नुकसानीची विमा भरपाई नाही. यामुळे शेतकरी आता दुहेरी कात्रीत सापडला आहे.पुढारी आणि सरकारची संशयास्पद शांतता!सर्वात दुर्दैवी बाब म्हणजे, शेतकऱ्यांच्या मतांवर निवडून आलेले पुढारी आता या प्रश्नावर मौन बाळगून आहेत. कोणताही मोठा नेता विमा कंपन्यांच्या कार्यालयावर धडक देऊन जाब विचारताना दिसत नाही. सरकार फक्त आकडेवारीचा खेळ खेळत आहे, प्रत्यक्ष जमिनीवर शेतकरी अनाथ झाला आहे, अशी भावना संतप्त शेतकरी व्यक्त करत आहेत. कोणत्याही पक्षाचा पुढारी तुमची दखल घेणार नाही, हे आता स्पष्ट झाले असल्याने शेतकऱ्यांनी स्वतःच रस्त्यावर उतरण्याचा पवित्रा घेतला आहे.शेतकऱ्यांचा निर्वाणीचा इशारा:गुन्हे नोंदवा: ज्या कंपन्यांनी विमा नाकारला, त्यांच्यावर तातडीने फौजदारी गुन्हे दाखल करावेत.थेट मदत: सोयाबीन आणि तुरीसाठी हेक्टरी भरीव मदत जाहीर करावी.बहिष्कार: जर विमा मिळाला नाही, तर आगामी काळात लोकप्रतिनिधींना गावबंदी करण्याचा इशारा अनेक गावांनी दिला आहे.

# पशुंच्या मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटलचे थाटात भूमीपूजन

## ज्यांना व्यक्त होता येत नाही,त्यांच्यासाठी काम करण्याची संधी मिळाली याचा सर्वाधिक आनंद - मंत्री पंकजा मुंडे

मुंबई : पशुसंवर्धन विभागाची मंत्री म्हणून काम करण्यात मला अतिशय आनंद आहे, ज्यांना व्यक्त होता येत नाही अशा मुक्या प्राणी, पशु पक्षांसाठी काम करण्याची संधी मला मिळाली यापेक्षा दुसरे समाधान काय असेल असं प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी येथे आज केलं.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर अंतर्गत मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय गोरेगाव संकुल परिसरात जिल्हा नियोजन विकास समितीच्या माध्यमातून ५८ कोटी रूपये खर्चून बांधण्यात येणा-या मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटलचे भूमीपूजन ना. पंकजाताई मुंडे आणि राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक मंत्री तथा मुंबई उप नगर जिल्हयाचे पालकमंत्री ना. आशिष शेलार यांच्या हस्ते आज मोठया थाटात संपन्न झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या. जोगेश्वरी पूर्व चे आ. अनंत नर, पशु विज्ञान विद्यापीठाचे कुलगूरू नितीन पाटील, अधिष्ठाता डॉ शिरीष उपाध्ये, सहयोगी अधिष्ठाता डॉ शैलेश इंगोले, भाजपचे जिल्हाध्यक्ष ज्ञानमूर्ती



शर्मा, नगरसेवक जितेंद्र वळवी आदी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला विधीवत पूजन आणि कोनशिलेचे अनावरण करून नवीन हॉस्पीटलच्या बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी बोलताना पंकजाताई म्हणाल्या, आशिष शेलार यांचं मुक्या प्राण्यावरील प्रेम सर्वानाच माहित आहे, मी देखील प्राणी प्रेमी आहे. पालकमंत्री या नात्याने त्यांनी जिल्हा नियोजन विकास समितीच्या माध्यमातून ५८ कोटी रूपये दिले, त्यातून इथे पशुसांठी एक सुसज्ज मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल उभं राहत आहे, याचं संपूर्ण श्रेय अर्थात शेलार यांचं आहे. आपल्याला केवळ हॉस्पीटल उभारून चालणार नाही तर रिसर्च मध्ये मोठं काम करावे लागेल. पशुसंवर्धन विभागाची मंत्री म्हणून काम करताना मला अतिशय आनंद होतो, ज्यांना व्यक्त होता येत नाही, त्यांच्यासाठी काम करण्याची संधी मला मिळालेली आहे. माणसाच्या डॉक्टरपेक्षा प्राण्यांचा डॉक्टर आशीर्वादाचा जास्त हक्कदार आहे. माणूस स्वतःची काळजी कशीही घेऊ शकेल पण मुक्या जीवाचे का? त्यांची काळजी आपल्यालाच घ्यावी लागेल. त्यांच्या अन्न, पाण्यासाठी सर्वांनी पुढे येऊन काम करावे. या भागात प्राण्यांसाठी यापेक्षा आणखी जास्तीत जास्त सुविधा कशा मिळतील यासाठी मी व शेलार आम्ही दोघे मिळून मुख्यमंत्र्यांची भेट घेऊ असं सांगत विभागाला जास्तीत जास्त प्रगतीपथावर आणण्यासाठी भविष्यात माझे प्रयत्न असणार आहेत असं त्या म्हणाल्या.

## मुरघास निर्मिती, देते जनावरांसाठी वर्षभर चाऱ्याची हमी!

पशुपालन व्यवसाय यशस्वी करायचा असल्यास सर्वात महत्त्वाचे आहे ते म्हणजे पशुखाद्य. कारण जनावरांना योग्य प्रमाणात आणि चांगल्या प्रतिचे पशुखाद्य पुरविले तर दुधाचे चांगले आणि गुणवत्तापूर्ण उत्पादन मिळते. जनावरांना देण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या पशुखाद्यांपैकी हिरवा चाऱ्यात सर्वात अधिक पौष्टिक घटक असतात. परंतु हा हिरवा चारा जनावरांना वर्षभर उपलब्ध होईलच असे नाही. यावर उपाय म्हणजे मुरघास निर्मिती. मुरघास म्हणजे हवा विरहित जागेत किण्वनीकरण (आंबवून) तयार करून साठवलेला चारा होय. या पद्धतीमुळे हिरवा चारा त्यातील पौष्टिक घटकांसोबत जास्त काळपर्यंत टिकवून ठेवता येतो.

मुरघासचे फायदे : हिरवा चारा त्याच्या गुणधर्मासह टिकविला जातो. वाळलेल्या चाऱ्यापेक्षा साठवणुकीस जागा सुद्धा कमी लागते. मुरघासला वाळवण्याची गरज नसल्यामुळे पावसाळ्यात सुद्धा तयार करता येतो. मुरघास रुचकर, कसदार, चवदार असल्यामुळे जनावरे आवडीने खातात तसेच पचायला हलका असतो. एकाच हंगामात जास्तीत जास्त मुरघास तयार करून दुसऱ्या हंगामात जमीन इतर पिकांसाठी वापरता येते. खरीप आणि रब्बी हंगामातील जास्तीचा हिरवा चारा साठवून चारा टंचाईच्या काळात वापरता येतो. पशुखाद्यावरील खर्च कमी होऊन दूध उत्पादनात सातत्य राहते.

मुरघास तयार करण्यासाठी वापरण्यात येणारी पिके : एकदल पिके मका, ज्वारी, बाजरी, ओट आणि गवत पिके, द्विदल पिके लुर्सन, चवळी, बरसीम, गवार, वाल आणि पावटा.

मुरघास तयार करण्यासाठी हे वापरावे? : प्लॅस्टिक बॅग ५ किलो, १० किलो, ५० किलो, १०० किलो, ५०० किलो, १००० किलो अशा प्रमाणात मुरघास बॅग उपलब्ध आहेत. या बॅग्स वारंवार वापरात येऊ शकतात. हाताळायलाही सोप्या असतात. प्लॅस्टिक ड्रमची क्षमता १००ते ३०० लिटरपर्यंत असते. ज्या ठिकाणी छोट्या प्रमाणात मुरघास तयार करावयाचा आहे आणि साखळी पद्धतीने वापरायचा आहे, त्या ठिकाणी ही पद्धत उपयुक्त आहे.



मुरघास तयार करण्याची प्रक्रिया : चारापिके ५० टक्के फुलोऱ्यात असताना कडबाकुट्टी यंत्राने लहान तुकडे करतात. एकदलवर्गीय पिकापासून आणि द्विदल वर्गीय पिकापासून मुरघास बनविताना ४:१ प्रमाण घ्यावे यामुळे रुचकर मुरघास बनतो. एकदलवर्गीय पिकापासून मुरघास बनवितेवेळी एक किलो युरिया १०० लिटर पाण्यात मिसळून हे मिश्रण चारा कुट्टीवर शिंपडतात. द्विदलवर्गीय पिकापासून मुरघास बनविताना त्यावर गूळ द्रावणाचे मिश्रण शिंपडतात. त्यासाठी एक किलो गूळ १०० लिटर पाण्यात विरघळवून द्रावण तयार केले जाते. कुट्टी तयार करून खड्ड्यात एक फुटापर्यंत थर येईल अशा पद्धतीने भरावे. प्रत्येक थरानंतर वर सांगितलेले द्रावण शिंपडावे. चाराकुट्टीचा थर खड्ड्यात भरताना दाब द्यावा, त्यामुळे चाऱ्यामध्ये हवा राहत नाही. अशा पद्धतीने थरावर थर देत जाऊन खड्डा भरावा. त्यावर वाळलेले गवत किंवा कडबा यांच्या मदतीने आच्छादन करतात. शेण व मातीच्या मिश्रणाने नंतर लिंपून गोलघुमटासारखा आकार द्यावा. साधारण दोन महिन्यांनी चांगला, स्वादिस्ट, रुचकर असा पौष्टिक मुरघास तयार होतो.

जनावरांना किती मुरघास द्यावा : गाई व म्हशीला २० ते २५ किलो मुरघास द्यावा. हा चारा दिवसातून २ ते ३ वेळा द्यावा. शेळी आणि मेंढीला ५०० ते ७०० ग्राम चारा द्यावा. दुधाळ जनावरांना मुरघास चारा धारा काढल्यानंतर द्यावा. चारा जर जास्तच आंबट किंवा आम्लयुक्त असेल तर तो थोडा वेळ सुकून द्यावा.

## पाणंद रस्ते, जमीन नोंदी व्यवस्थेला गती देणार - चंद्रशेखर बावनकुळे

निफाड / प्रतिनिधी

ग्रामीण भागातील पाणंद रस्ते अतिक्रमणमुक्त करणे, सीमांकन मोजणीची प्रकरणे तातडीने निकाली काढणे, तसेच जमीन नोंदी व्यवस्थेत पारदर्शकता आणण्यासाठी महसूल विभागामार्फत राज्यभर विशेष मोहीम राबवून गती देणार असल्याचे प्रतिपादन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

निफाड तालुक्यातील पिंपळगाव बसवंत येथे आयोजित शिबिरात मंत्री बावनकुळे बोलत होते. यावेळी आमदार दिलीप बनकर, पिंपळगाव बसवंतचे नगराध्यक्ष डॉ.मनोज बर्डे, ओझर नगराध्यक्षा अनिता घेगडमल, विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, सहाय्यक जिल्हाधिकारी पवन दत्ता, उपविभागीय अधिकारी डॉ.शशिकांत मंगरुळे, भूमी अभिलेख विभागाचे उपसंचालक महेश इंगळे, तहसीलदार विशाल नाईकवाडे, तहसीलदार (सामान्य शाखा) प्रदीप वर्पे यांच्यासह नागरिक,लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंत्री बावनकुळे म्हणाले, पाणंद रस्ते हे ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शेती विकासाचा महत्त्वाचा घटक असून शेतीमाल वाहतूक,सिंचन सुविधा आणि गावातील दळणवळण सुरळीत ठेवण्यासाठी अतिक्रमण हटवून रस्ते कायमस्वरूपी मोकळे ठेवण्यावर भर देण्यात येणार आहे. आवश्यक ठिकाणी सीमांकन मोजणी करून रस्त्यांची रुंदी निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. मोजणी विभागावरील वाढता ताण लक्षात घेऊन परवानाधारक खासगी सर्वेअर (लायसन्सी सर्वेअर) यांची मदत घेण्याबाबत सकारात्मक भूमिका शासनाने स्वीकारली असून मोजणीची कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यात येणार आहे. ड्रोन सर्वेक्षण, डिजिटल भू-नकाशे आणि ऑनलाइन नोंद प्रणालीद्वारे जमीनविषयक सेवा अधिक पारदर्शक आणि सुलभ करण्याचे उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी सांगितले. शेतकरी हा केंद्रबिंदू मानून विविध योजनांच्या माध्यमातून शेती अधिक सक्षम आणि शाश्वत करण्यासाठी प्रयत्न सुरू असून, नैसर्गिक संकटांचा सामना करतानाही शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे आमदार श्री.बनकर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले. उपविभागीय अधिकारी डॉ.मंगरुळे यांनी प्रास्ताविकातून महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती यावेळी दिली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महसूल मंत्री श्री.बावनकुळे यांच्या हस्ते विविध महसूल सेवा देणाऱ्या स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले.



### 'लँड टायटल' व्यवस्थेला बळकटी :

जमिनीच्या मालकी हक्कासंदर्भातील वाद कमी करण्यासाठी लँड टायटल व्यवस्थेला अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने आवश्यक कायदे व नियमांमध्ये सुधारणा करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे. ग्रामीण भागातील विकासकामे,रस्ते,सिंचन आणि महसूल विषयक प्रकरणे प्राधान्याने मार्गी लावून नागरिकांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे,असे निर्देशही बावनकुळे यांनी यावेळी दिले.

## दिन विशेष

### जागतिक दिवस:
### राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन : भारत.
### मातृत्व दिन

### महत्वाच्या घटना

१५०२ : ख्रिस्तोफर कोलंबस आपल्या ४ थ्या आणि अखेरच्या सफरीवर वेस्ट इंडिज बेटांकडे निघाला.
१८११ : चँग आणि एंग (बंकर) या प्रसिद्ध सयामी जुळ्यांचा एका चिनी दांपत्याच्या पोटी जन्म. (मृत्यू: १७ जानेवारी १८७४)
१८५७ : पहिला भारतीय स्वातंत्र्य संग्राम स्वातंत्र्यसैनिकांनी दिल्ली शहर जिंकले.
१८५८ : मिनेसोटा अमेरिकेचे ३२ वे राज्य झाले.
१८६७ : लक्झेंबर्गला स्वातंत्र्य मिळाले.
१८७८ : महाराष्ट्रातील पुणे शहराच्या हिराबागेत मराठी ग्रंथकारांचे पहिले संमेलन भरले होते. यालाच अखिल भारतीय साहित्य संमेलन म्हणून संबोधले जाते.
१८८८ : ज्योतिबा फुले यांना 'महात्मा' ही पदवी देण्यात आली.
१९२० : स्त्रियांना पदवीपरीक्षेसाठी प्रवेश देण्याचा ऑक्सफर्ड विद्यापिठाचा निर्णय.
१९२७ : चलत चित्र कला व विज्ञान अकादमीची स्थापना. ही संस्था दरवर्षी ऑस्कार पुरस्कार बहाल करते.
१९४९ : इस्त्रायलचा संयुक्त राष्ट्रांत समावेश झाला.
१९४९ : सियाम या देशाने अधिकृतरीत्या दुसऱ्यांदा आपले नाव बदलुन थायलंड केले.
१९५१ : गझनीच्या महंमदने उध्दवस्त केलेया बारा ज्योतिर्लिंगापैकी एक सोमनाथ या मंदिरात शिवलिंग प्रतिष्ठापना डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते झाली.
१९८७ : गोव्याला स्वतंत्र राज्याचा दर्जा मिळाला.
१९९६ : माउंट एव्हरेस्ट आपत्ती: एकाच दिवसात माउंट एव्हरेस्टच शिखर चढणाऱ्या ८ लोकांचे निधन झाले.
१९९८ : २४ वर्षांनंतर भारताने पुन्हा राजस्थानच्या वाळवंटातील पोखरणच्या परिसरात हायड्रोजन बॉम्बनिर्मितीसाठीच्या साधनासह तीन यशस्वी आण्विक चाचण्या केल्या.
१९९८ : राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन
१९९९ : टेनिस सम्राज्ञी स्टेफी ग्राफ हिने जर्मन खुल्या टेनिस स्पर्धेत आपल्या कारकिर्दीतील १,००० वा सामना खेळण्याचा एक वेगळा विक्रम प्रस्थापित केला

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८९५ : जे. कृष्णमुर्ती, भारतीय तत्त्वज्ञानी.
१९०४ : स्पॅनिश चित्रकार साल्वादोर दाली यांचा जन्म. (मृत्यू: २३ जानेवारी १९८९)
१९१२ : भारतीय-पाकिस्तानी लेखक आणि पटकथालेखक सादत हसन मंटो यांचा जन्म. (मृत्यू: १८ जानेवारी १९५५)
१९१४ : संगीत रंगभूमीला नवचैतन्य देणार्या गायिका आणि अभिनेत्री ज्योत्स्ना भोळे यांचा जन्म. (मृत्यू: ५ ऑगस्ट २००१)
१९१८ : क्वांटम इलेक्ट्रोडायनॅमिक्स मधील मूलभूत संशोधनाबद्दल नोबेल पारितोषिक मिळवणारे अमेरिकन पदार्थवैज्ञानिक रिचर्ड फाइनमन यांचा जन्म. (मृत्यू: १५ फेब्रुवारी १९८८)
१९४६ : कृत्रिम हृदय विकसित करणारे कार्डियोलॉजिस्ट रॉबर्ट जार्विक यांचा जन्म.
१९५० : सुप्रसिद्ध भारतीय हिन्दी-मराठी चित्रपट अभेनिते सदाशिव दत्ताराय अमरापूरकर यांचा जन्मदिन.
१९६० : अभिनेता सदाशिव अमरापूरकर यांचा जन्म.
१९७२ : जेकब मार्टिन, भारतीय क्रिकेट खेळाडू.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७१ : ब्रिटिश गणितज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ, रॉयल ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटीचे संस्थापक सर जॉन विल्यम हर्षेल यांचे निधन. (जन्म: ७ मार्च १७९२)
१८८९ : जॉन कॅडबरी, इंग्लिश उद्योगपती.
१८८५ : लोकनेते कृष्णमोहन बंदोपाध्याय.
१९९३ : शाहू मोडक, अभिनेते.
२००४ : चित्रकार व नृत्यदिग्दर्शक कृष्णदेव मुळगुंद यांचे निधन. (जन्म: २७ मे १९१३)
२००९ : भारतीय नौसेनाधिपती सरदारिलाल माथादास नंदा यांचे निधन. (जन्म: १० ऑक्टोबर १९१५)

# कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक विनाशाच्या उंबरठ्यावर

## किलोला मिळतोय फक्त ५० पैशांचा दर, सरकारने दिलासा द्यावा अन्यथा शेतकरी आक्रमक

नाशिक : महाराष्ट्रात कांदा उत्पादक शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत भीषण, वेदनादायक आणि संतापजनक झाली आहे. राज्यातील लाखो शेतकरी अक्षरशः आर्थिक गर्तेत ढकलले गेले आहेत. गेल्या काही महिन्यांपासून कांद्याचे बाजारभाव सातत्याने कोसळत असून दुसऱ्या बाजूला उत्पादन खर्च प्रचंड वाढला आहे. परिणामी शेतकरी नफा तर दूरच, पण उत्पादन खर्चसुद्धा वसूल करू शकत नाही. राज्यातील अनेक बाजार समित्यांमध्ये कांद्याला कवडीमोल दर मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे आणि अनेक ठिकाणी आंदोलनाची ठिणगी पडू लागली आहेत. महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेकडे राज्यातील विविध जिल्ह्यांमधून धक्कादायक माहिती सातत्याने प्राप्त होत आहे. ही माहिती पाहता राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक, मानसिक आणि सामाजिकदृष्ट्या कोलमडत चालल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. सरकारनं कांद्याच्या दराप्रश्न मध्यस्थी करावी अन्यथा तीव्र आंदोलन करणार असल्याची माहिती कांदा उत्पादक शेतकरी संघटनेनं दिली आहे.

बीड जिल्ह्यातील नेकनूर येथील एका शेतकऱ्याने तब्बल ४१ पोते कांदा सोलापूर मार्केटमध्ये विक्रीसाठी नेला. परंतु त्यातील फक्त २० पोते कांदा विकला गेला आणि सर्व खर्च, हमाली, तोलाई, दलाली, बाजार शुल्क, वाहतूक व इतर कपाती वजा जाता त्या शेतकऱ्याच्या हातावर अवघे ५१९ रुपये उरले. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे उर्वरित २१ पोते कांदा विकलाच गेला नाही आणि तो कांदा आजही बाजारात तसाच पडून असल्याची माहिती स्थानिक शेतकऱ्यांनी संघटनेकडे पाठवली आहे. ही घटना फक्त एका शेतकऱ्याची नाही तर महाराष्ट्रातील लाखो कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या वेदनेचा आणि व्यवस्थेविरोधातील संतापाचा जिवंत पुरावा आहे. नाशिक जिल्ह्यातील सटाणा बाजार समितीत तर परिस्थिती आणखी भयावह झाली आहे. तेथे एका शेतकऱ्याच्या कांद्याला अवघा ५० रुपये क्विंटल म्हणजे ५० पैसे किलो इतका अत्यंत कमी दर मिळाला. ज्या कांद्याला पिकवण्यासाठी हजारो रुपये खर्च होतात, त्या कांद्याची किंमत आज पाण्यापेक्षाही कमी झाली आहे. या घटनेमुळे संतप्त झालेल्या संबंधित शेतकऱ्याने बाजार समितीतच आत्महत्येचा प्रयत्न केल्याची माहिती स्थानिक शेतकऱ्यांनी संघटनेकडे दिली आहे. आज परिस्थिती अशी झाली आहे की शेतकरी आपल्या घामाचे, कष्टाचे आणि आशेचे पीक बाजारात घेऊन येतो. पण बाजारात त्याच्या मालाची अक्षरशः चेष्टा केली जाते. ही अवस्था कोणत्याही संवेदनशील समाजाला लाज वाटावी अशी आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर कृषी उत्पन्न बाजार समितीतही कांद्याला अत्यंत कमी दर पुकारण्यात आल्याने संतप्त शेतकऱ्यांनी बाजार समितीच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन केले आणि कांदा लिलाव बंद पाडले. राज्यातील अनेक बाजार समित्यांमध्ये आता शेतकऱ्यांचा रोष उघडपणे दिसू लागला आहे. राज्यातील कांदा उत्पादन खर्चातील तोटा तब्बल चार ते पाच हजार कोटी रुपयांवर पोहोचला आहे. गेल्या काही वर्षांत बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, मजुरी, सिंचन, वीज, वाहतूक, साठवणूक आणि इतर सर्व खर्च प्रचंड वाढले आहेत. परंतु दुसऱ्या बाजूला कांद्याचे बाजारभाव कोसळल्याने शेतकरी पूर्णपणे आर्थिक संकटात सापडला आहे.






सोमवार दि.११ मे २०२६ ५

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत




# नवीन पोलीस अधीक्षक रुजू होताच गुटखा व दारु विक्रेत्यांवर कारवाया सुरु

मंठा। प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू रोज होताच मंठा शहर व तळणी परिसरात अवैध गुटखा व अवैध दारू विक्रेत्यांच्या विरोधात पोलिसांनी धाडसत्र सुरू केल्यामुळे अवैध गुटखा व दारू विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत. मंठा पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेने शनिवार ता. ९ मे रोजी एकाच दिवशी चार ते पाच ठिकाणी धाडी टाकल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. तसेच तळणी परिसरात झन्नामन्ना नावाच्या जुगार अड्ड्यावर धाड टाकून ११ जणांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. तळणी येथील दत्ता आत्माराम सरकटे यांच्या पान टपरीवर धाड टाकून प्रीमियम ९००० नावाचे एकूण २१ पुडे प्रति पुडा १४० प्रमाणे एकूण २९४० /- , गोवा १००० नावाचे एकूण नऊ पुडे प्रति पुडा रुपये २०० प्रमाणे एकूण किंमत १८००/- रुपये असा एकूण ४७४० रुपयाचा महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला गुटखा व सुगंधी जळगाव चोरटी वाहतूक करताना आढळून आल्यामुळे आरोपी विरुद्ध पोलीस अमलदार अनिल रमेश राठोड यांच्या फिर्यादीवरून कलम २२३, २७४, २७५ भा. न्या. सं. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तळणी येथील शालिग्राम नारायण कुकडे यांच्या पान टपरीवर विमल पान मसाला नावाचे आठ पुडे प्रति पुडा ४८० रुपये प्रमाणे ३८८० रुपये, राजनिवास सुगंधित पानमसाला नावाचे सहापुडे प्रतिपुडा १४४ प्रमाणे एकूण ८६४ रुपये, विमल छोटा पॅक नावाचे एकूण सातपुडे दोनशे रुपये प्रतिपुडा प्रमाणे १४०० रुपये, विमल १ बिग नावाचे एकूण सहा पुडे प्रति पुडा २० रुपये प्रमाणे १२० रुपये, केशरयुक्त पान मसाला नावाचे चार पुडे प्रतिपुडा १९८ प्रमाणे ७९२ रुपये असा एकूण ७०५६ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पोलीस अंमलदार सुनील भगवानराव होंडे यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच आरोपी माऊली बाबुराव रणभवरे रा. मार्केट यार्ड मंठा याच्यात ताब्यातील देवी रोड येथे एका पत्राच्या शेडमध्ये बेकायदेशीररित्या देशी दारू भिंगरी संत्रा नावाचे लेबल असलेले १८० एम एलचे २४ काचेच्या बाटल्या एकूण २४०० रुपये मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पोलीस अंमलदार संतोष बाबुराव बनकर यांच्या फिर्यादीवरून आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच विडोळी फाट्यावरील एका पान टपरीवर महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला गोवा १००० चे १७ पुडे एकूण किंमत ३४०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पोलिस अंमलदार संतोष बाबुराव बनकर यांच्या फिर्यादीवरून आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेकडून पत्त्याच्या अड्ड्यावर कारवाईमंठा तालुक्यातील तळणी शिवारात तळ्याच्या बाजूला एका लिंबाच्या झाडाखाली आरोपी हे स्वतःच्या फायद्यासाठी झन्नामन्ना नावाचा जुगार खेळताना व खेळविताना मिळून आले. यातील आरोपी शेख इमरान शेख फारुख रा. लोणार, इम्तियाज खान सरफराज खान रा. लोणार, मोसिन अफरोज खान रा. लोणार, ज्ञानेश्वर हरिभाऊ सोनवणे रा. दुसरबीड, समाधान किसन सरकटे रा. तळणी, सुनील जयवंत खरात रा. लोणार, शेख ताजु शेख नासीर रा. लोणार, लक्ष्मण भीमराव जाधव रा. सासखेडा, अरुण पांडुरंग जाधव रा. सासखेडा, सय्यद सोहिल सय्यद सरताज रा. किनगाव जट्टू आणि इमरान खान शेर खान रा. लोणार यांच्या ताब्यातील मुद्देमाल वेगवेगळ्या रंगाचे कॉइन, जुगाराचे साहित्य, मोबाईल व नगदी असे मिळून ३, ५२, ४६०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हेडकॉन्स्टेबल गोपाल नरहरी गोशिक यांच्या फिर्यादीवरून आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जिल्हा, तालुका कोर्टाला ११ मेपासून उन्हाळी सुट्टी

## फौजदारी न्यायालयाचे कामकाज सुरू राहणार




जालना। प्रतिनिधी

उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार जालना जिल्ह्यातील जिल्हा व सर्व तालुका निवाणी न्यायालयांना सन २०२६ या वर्षासाठी उन्हाळी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. ही उन्हाळी सुट्टी दिनांक ११ मे ते ७ जून २०२६ या कालावधीत असेल.

उच्च न्यायालयाच्या परिपत्रकान्वये जिल्हा व तालुका स्तरावरील दिवाणी न्यायालयांना ही सुट्टी लागू राहील. मात्र, या सुट्टीच्या कालावधीत सर्व फौजदारी न्यायालये आणि सुट्टीतील रिमांडचे कामकाज नियमितपणे सुरू राहणार आहे.

जेणेकरून तातडीच्या फौजदारी प्रकरणांमध्ये नागरिकांची गैरसोय होणार नाही.फौजदारी न्यायालयाचे दैनंदिन कामकाज व सुट्टीतील रिमांड बोर्ड नियमितपणे सुरू राहील. जून २०२६ पासून सर्व दिवाणी न्यायालयांचे कामकाज पुन्हा नियमित वेळेत सुरू होईल, अशी माहिती ॲड. अरविंद मुरमे यांनी दिली.

## || थोडक्यात



### सोमनाथ विद्यालय शाळेतून सायली संग्राम रोडे प्रथम

परतुर। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या फेब्रुवारी २०२६ च्या एसएससी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून सोमनाथ विद्यालय, कन्हेरवाडी येथील कु. सायली संग्राम रोडे हिने ८६.२० टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे.सायली हिने मराठी विषयात ९४, हिंदीत ९१, इंग्रजीत ७७, गणितात ५५, विज्ञान व तंत्रज्ञान विषयात ७६ तर सामाजिक शास्त्र विषयात ९० गुण मिळवले. तिला एकूण ५०० पैकी ४२८ गुण तसेच क्रीडा व कला क्षेत्रातील अतिरिक्त ३ गुण प्राप्त झाले आहेत.सायलीच्या या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक परंपरेत मानाचा तुरा रोवला गेला असून परिसरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तिच्या यशामागे आई-वडिलांची मेहनत, शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन व स्वतःची चिकाटी असल्याची भावना व्यक्त करण्यात आल्या.

### राहुल काळे यांनी सिलंबम स्पर्धेत गोल्ड व सिल्वर मेडल मिळेल

परतूर। प्रतिनिधी

जालना येथे राष्ट्रीय सिलंबम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते राष्ट्रीय सिलंबम स्पर्धेतआंतरराष्ट्रीय निवड चाचणीसाठी परतुरच्या सिलंबम खेळाडू राहुल काळे यांनी




गोल्ड मेडल व सिल्वर मेडल प्राप्त करून मोठे यश मिळविले आहे.यावेळी महाराष्ट्रातील एकमेव आंतरराष्ट्रीय सिलंबम एक्स्पर्ट संजय बनसोडे, आंतरराष्ट्रीय महिला रेफरी स्मिता धीवर,केतन नवले,किरण अडागले, नॅशनल रेफरी रविराज चखाले, गणेश चखाले, गणेश गजगे, विदर्भ विभाग प्रमुख दुर्गराज रामटेके, मराठवाडा विभाग प्रमुख तथा मुख्य आयोजक जालना जिल्हा सिलंबम स्पोर्ट्स असोसिएशन चे अध्यक्ष भूषण यादव, प्रतीक्षा दब्बडवार, प्रेरणा जरींग, उषा पवार, परतूर तालुका प्रमुख रोहित जैस्वाल, भोकरदन तालुका प्रमुख अनिकेत सोनुने, किरण देशमुख, किशोर माधोवाल,अजय सरकटे यांची उपस्थिती होती. जालना जिल्हा सिलंबम स्पोर्ट्स असोसिएशन शाखा परतुरचे कोच रोहित माणिक जैस्वाल. यांच्या मार्गदर्शनाखाली राहुल काळे यानी उत्कृष्ट सराव व मेहनतीच्या जोरावरआपले स्थान नॅशनल मध्ये निश्चित केले आहे. राहुल याच्या यशामुळे परतुर तालुक्यात आनंदाचे वातावरण असून, खेळाडू, पालक व क्रीडाप्रेमींनी त्यांचे अभिनंदन केले आहे. आगामी राष्ट्रीय स्पर्धेत राहुल उत्कृष्ट कामगिरी करून जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# जालन्यात रस्त्यावरील ४० ठिकाणचं अतिक्रमण काढले; वाहतुकीचा मार्ग मोकळा

जालना। प्रतिनिधी

जालना शहर महानगरपालिकेची धडक अतिक्रमण मोहीम गरीब शहा बाजार व बस स्थानक परिसरातील ४० अतिक्रमणे निष्कासित रस्त्यावरील पक्की शेड हटवून वाहतुकीचा मार्ग मोकळा; स्वतःहून अतिक्रमणे काढण्याचे आयुक्त अंजली शर्मा यांनी आवाहन केले होते. परंतु स्वतःहून अतिक्रम न काढल्यामुळे महानगरपालिका च्या मार्फत अतिक्रमण काढण्यात आले.

शहराला अतिक्रमणमुक्त करण्यासाठी आणि वाहतूक कोंडीतून नागरिकांची सुटका करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने आजपासून धडक मोहीम हाती घेतली आहे. आज दिनांक ९ मे २०२६ रोजी शहरातील मुख्य बाजारपेठ असलेला गरीब शहा बाजार आणि बस



स्थानक परिसरातील तब्बल ४० अतिक्रमणे महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने निष्कासित केली.

कारवाईचा तपशील शहरातील गरीब शहा बाजार भागातील विविध आस्थापना आणि दुकानदारांनी रस्त्यावर पक्की शेड उभारून मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले होते. यामुळे वाहनधारकांना व पादचाऱ्यांना चालणे कठीण झाले होते. या तक्रारींची दखल घेत आज सकाळी या मोहिमेला सुरुवात करण्यात आली. गरीब शहा बाजार येथील मोहिमेनंतर पथकाने आपला मोर्चा बस स्थानक रस्त्याकडे वळवला. या दोन्ही परिसरातील एकूण ४० अनधिकृत बांधकामे व शेड जेसीबीच्या साहाय्याने जमीनदोस्त करण्यात आली. प्रशासकीय उपस्थिती सदर मोहीम आयुक्त श्रीमती अंजली शर्मा यांच्या आदेशानुसार आणि उपायुक्त श्री. त्र्यंबक कांबळे तसेच सहाय्यक आयुक्त श्री. विजय फुलंब्रीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

या कारवाईत नगररचना विभागाच्या श्रीमती तेजश्री शिंदे व त्यांचे कर्मचारी, अतिक्रमण पथक प्रमुख राठोड,सहाय्यक अतिक्रमण अधिकारी सॅमसन कसबे आणि सर्व स्वच्छता निरीक्षक व त्यांचे अधिनिस्त कर्मचारी सक्रिय सहभागी झाले होते. आयुक्त अंजली शर्मा यांचा इशारा शहरातील सौंदर्य आणि वाहतुकीची व्यवस्था अबाधित राखण्यासाठी ही मोहीम यापुढेही सातत्याने सुरू राहणार आहे.

मा. आयुक्त श्रीमती अंजली शर्मा यांनी स्पष्ट शब्दात आवाहन केले आहे की, ज्या दुकानदारांनी किंवा आस्थापनांनी रस्त्यावर अथवा नाल्यावर अनधिकृतपणे अतिक्रमण केले असेल, त्यांनी ते स्वतः हून त्वरित काढून घ्यावे. अन्यथा, महानगरपालिकेद्वारे ही अतिक्रमणे तोडली जातील आणि होणाऱ्या नुकसानीस संबंधित जबाबदार राहतील महानगरपालिकेच्या या आक्रमक पवित्र्यामुळे शहरातील अतिक्रमणधारकांचे धाबे दणाणले असून, नागरिकांनी या कारवाईचे स्वागत केले आहे.

# मंठा शहरात खतांची चढ्या भावाने विक्री; जिल्हा कृषी अधीक्षक यांच झोपेचं सोंग

मंठ। प्रतिनिधी

राज्यात युद्धजन्य परिस्थितीमुळे खतांच्या आयातीवर मर्यादा आल्याने खतांच्या कृत्रिम तुटवड्याचा फायदा घेत मंठा शहरातील कृषी सेवा केंद्राचे संचालक काळाबाजार आणि साठेबाजी करताना दिसून येत आहेत. याप्रकरणी जिल्हा कृषी अधीक्षक कापसे झोपेचं सोंग घेत असल्याचे दिसून येत. जिल्हा कृषी अधीक्षक व जिल्हा परिषद कृषी अधिकारी . मंठा पंचायत समिती कृषी अधिकारी. मंठा तालुका कृषी अधिकारी यांच्या संगणमताने हा सर्व प्रकार सुरू असल्याचे बोलल्या जात आहे.शेतकऱ्यांची आर्थिक लूट करणाऱ्या खत विक्रेत्यांनी विरोधात कृषी विभागाने कारवाई करावी अशी मागणी होत आहे. खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांची खते खरेदी करण्यासाठी लगबग सुरू असून वरूनच भाव वाढले आहेत असे सांगून विक्रेते खताची अव्वाच्या सव्वा भावाने विक्री करीत असल्याच्या तक्रारी आहेत. मंठा शहरातील खते विक्रेत्यांनी आपापल्या गोडाऊनमध्ये खतांचा साठा केला असून कृषी विभागाने गोडाऊनसह आवक - जावक रजिस्टर तसेच जीएसटी पावती बुके खत विक्री केंद्राची तपासणी केल्यास खतांचा काळाबाजार उघडकीस येण्याची दाट शक्यता आहे. मंठा शहरात युरिया खत उपलब्ध नसल्याचे खत विक्रेते सांगत असून डीएपी, १२ : ३२ : १६, १० : २६ : २६, २३ : २३ : ०, १५ : १५ : १५ ही खते शेतकरी खरीप हंगामासाठी खरेदी करताना दिसून येत आहेत. खते खरेदी केल्यानंतर विक्रेते शेतकऱ्यांना ओरिजनल जीएसटी पावती ऐवजी कोटेशन चा कागद शेतकऱ्यांना देऊन त्यांची फसवणूक करीत आहेत. येथील खत विक्री केंद्राची तपासणी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी कृषी विभागाला आदेश द्यावेत अशी मागणी होत आहे.

# निरखेडा येथील युवकांचा भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश

जालना। प्रतिनिधी

निरखेडा ता.जालना येथील युवकांनी आज (ता.०९) रोजी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला. जालना जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या माजी केंद्रीय मंत्री श्री. रावसाहेब पाटील दानवे यांच्या नेतृत्वावर विश्वात ठेऊन व भास्कर आबा दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली युवकांनी भाजपात प्रवेश केला. प्रवेश करणाऱ्यांमध्ये विनायक राठोड, गौतम मोरे, कृष्णा चव्हाण, कृष्णा पाडमुख, रमेश राठोड यांचा समावेश आहे. या प्रवेशामुळे पक्ष अधिक सक्षम होऊन सर्वांगीण विकासाला गती मिळेल असे प्रतिपादन भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी केले व सर्वांचे पक्षामध्ये मनःपूर्वक स्वागत करून त्यांच्या राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी सरपंच राजाराम जाधव, सरपंच बद्रीनाथ भसांडे, देविदास देशमुख यांची उपस्थिती होती.

# पेट्रोल पंपांवर स्कॅनरने गंडवणारी टोळी जेरबंद

नांदेड। प्रतिनिधी

पेट्रोल पंपावरील क्यूआर कोड स्कॅनरचा वापर करून तांत्रिक फेरफार करत चालकांची फसवणूक करणाऱ्या एका आंतरराज्य टोळीचा नांदेड सायबर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली असून, त्यांच्याकडून एक चारचाकी वाहन, पाच महागडे मोबाईल आणि रोख रक्कम असा एकूण ९ लाख ३१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

देगलूर आणि बिलोली परिसरातील अनेक पेट्रोल पंपांवर गेल्या काही दिवसांपासून ही टोळी सक्रिय होती. आरोपी पेट्रोल पंपावरील स्कॅनरवर बनावट पद्धतीने पैसे पाठवल्याचे भासवून त्या बदल्यात पेट्रोल पंप चालकांकडून रोख रक्कम घेत असत. या माध्यमातून त्यांनी देगलूर, नरसी, बिजूर, वझरगा आणि अटकळी येथील विविध पंपांवरून ६ लाख २४ हजार ८०८ रुपयांची फसवणूक केली होती. याप्रकरणी शेख मसूद यांनी देगलूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलिस अधीक्षक अविनाश कुमार यांनी सायबर पोलिस ठाण्याचे निरीक्षक वसंत सप्रे यांना तपासाचे आदेश दिले होते. सायबर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने जाळे विणले. देगलूर परिसरात ही टोळी पुन्हा सक्रिय झाल्याची माहिती मिळताच सापळा रचून एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर अधिक चौकशीत या टोळीची पाळेमुळे तेलंगणा आणि पुण्यापर्यंत पसरल्याचे समोर आले. ही कारवाई सायबर पोलिस निरीक्षक वसंत सप्रे, राजेंद्र सिटीकर, दीपक, विलास राठोड, अविनाश ढोके, दाविद पिडगे, काशिनाथ कारखेडे आणि ज्ञानेश्वर यन्नावार यांच्या पथकाने केली. अल्ताफ सरवर आत्तार (वय २३, रा. पुळा, जि. कामारेड्डी), योगेश उत्तम पांचाळ (वय २६, रा. पुळा, जि. कामारेड्डी, तेलंगणा), तौफीक अग्रफ शेख (वय २३, रा. जालना, सध्या मुक्काम पुणे.

# विद्यार्थ्याची गळफास घेऊन आत्महत्या

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी

दहावीच्या निकाल जाहीर होण्यास काही तास उरलेले असतानाच एका १५ वर्षीय विद्यार्थ्याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना पुंडलिकनगर भागात उघडकीस आली. सोहम ज्ञानेश्वर मोरे (१५ वर्षे ११ महिने) असे या मृत विद्यार्थ्यांचे नाव आहे. आत्महत्येपूर्वी रात्री त्याने आपले सर्व सोशल मीडिया अकाउंट्स डिलीट केल्याची माहिती त्याच्या मित्रांनी दिली.

नातेवाईकांनी दिलेल्या माहितीनुसार, सोहम इयत्ता दहावीत शिकत होता. शुक्रवारी त्याचा निकाल होता. सोहमचे वडील राज्य परिवहन महामंडळात (एसटी) मेकॅनिक म्हणून कार्यरत आहेत, तर त्याची आई एका मेसमध्ये काम करून कुटुंबाला हातभार लावते. दहावीची परीक्षा संपल्यानंतर सोहम पुण्याला त्याच्या काकांकडे गेला होता. गुरुवारी सायंकाळी तो पुण्याहून शहरात परतला होता. रात्री त्याने सर्व मित्रांची भेट घेतली. त्याने मामालासुद्धा कॉल केला पण लागला नाही. त्यानंतर त्याने स्वतःचे सर्व सोशल मीडिया अकाउंट्स डिलीट केले. शुक्रवारी सकाळी साडेसात वाजता आईला तिच्या कामाच्या ठिकाणी सोडले आणि घरी परतल्यावर एकटाच असताना किचनमध्ये गळफास घेतला. त्याला बेशुद्धावस्थेत घाटी रुग्णालयात दाखल केले असता, डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी पुंडलिकनगर ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# लोहा कंधार ३६१ एफ राष्ट्रीय महामार्ग झाला मृत्यूचा सापळा!

## एनएएचआय आणि एसी शेख कंन्स्ट्रक्शन यांच्यातील फिक्सिंग ;लोहा कंधार राष्ट्रीय महामार्ग अधोगतीकडे ?

पाथर्डी । प्रतिनिधी

लोहा कंधार ३६१एफ खरवंडी कासार नवगण राजुरी या ५३ कि.मी.लांबीच्या रस्त्याचे काम तब्बल दहा वर्षाहून अधिक काळ झाला तरी अपूर्ण अवस्थेत आहे खरवंडी कासार मालेवाडी श्रीपतवाडी या रस्त्यावरील अर्धवट पॅचेस सोडले असून रस्त्यावरील पूल वाहतुकीसाठी धोकादायक बनला आहे या मार्गावर आतापर्यंत १४० होऊन अधिक अपघात झाले आहेत यात काही निष्पाप वाहतूकदारांचा बळी गेला आहे तर काही जायबंदी झाले आहेत यामुळे लोहा कंधार राष्ट्रीय महामार्ग मृत्यूचा सापळा बनला आहे लोहा कंधार या राष्ट्रीय महामार्गाचे निकृष्ट दर्जाचे केलेले काम याला कारणीभूत आहे यामुळे तातडीने या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू करून गुण नियंत्रण कक्षाकडून तपासणी करून एसी शेख कन्टक्शन ठेकेदाराचे देयके थांबवून सदरील कंट्रक्शन एजन्सीला ब्लॅक लिस्ट करण्यात यावे व खरवंडी कासार ते भालगाव पर्यंत ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहण केले आहेत त्या शेतकऱ्यांच्या मावेजा तातडीने देण्यात यावा लोहा कंधार राष्ट्रीय महामार्ग ३६१ एफ खरवंडी कासार ते नवगण राजुरी रस्त्याचे काम सुरू करण्यात यावे अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे अन्यथा छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्ग उपविभागीय कार्यालय समोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

२७० कोटी पेक्षा जास्त बजेट असलेल्या या रस्त्यासाठी अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम करून जिल्हा मार्गप्रमाणे रस्ता तयार करण्यात आला आहे त्यापेक्षा अधिक खरवंडी कासार बायपास ते ढाकणवाडी फाटा जवळपास तीन किलोमीटर दोन पदरी रस्ता रस्त्याच्या दुतर्फा साईट गटार ड्रेनेज वॉटर लाईन पथदिवे इत्यादी काम केले गेले नाही दहा वर्षाच्या कालखंडानंतर सिमेंट काँक्रिटीकरण रस्ता पूर्णपणे नादुरुस्त आणि उखडलेला असल्याने त्यावर पुन्हा डांबराचे अर्धवट लेयर टाकले आहे या महामार्गाच्या कामात एनएचआय व कंत्राटदार यांच्या फिक्सिंग झाल्याने महामार्ग रखडत पडला आहे.

अशोक खरमाटे ( खरवंडी कासार )

# भुसंपादन घोटाळ्यात सहकारी बँकेवर कारवाई होणार!

**बीड । प्रतिनिधी**

**बोगस निवाडे तयार करून मागच्या तारखेत सह्या करून शासनाला तब्बल २४१ कोटी रुपयांपेक्षा अधिक चा चुना लावल्याप्रकरणी बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना अटक झाली त्यानंतर या प्रकरणात आणखी कोण कोण अडकणार अशी चर्चा सुरू झाली आहे.विशेष बाब म्हणजे बीड शहरातील भाग्यनगर भागात असलेल्या एका सहकारी बँकेतून एकाच दिवशी अनेक खाते उघडून हे पैसे लाभार्थी,त्यांचे वकील, महसूल मधील अधिकारी कर्मचारी आणि दलालांना वाटप झाले त्या बँकेवर आणि स्थानिक सल्लागार व्यापारी यांच्यावर देखील कारवाई होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.**

सोलापूर धुळे या राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी झाल्या यामध्ये मुख्य आरोपी हे बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक असल्याचा दावा करत बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी महसूल मंत्र्यांकडे तक्रार केली होती.या भूसंपादन घोटाळ्यामध्ये भूसंपादन समन्वय उपजिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी संजय हंगे यांच्यासहित डी टी पी ऑपरेटर क्लार्क यांनी उपजिल्हाधिकारी जिल्हाधिकारी आणि वकील या सगळ्यांशी संगणमत करून तब्बल २४१ कोटी रुपयांचा अपहार केला शासनाची फसवणूक केली.

या प्रकरणात दोन दिवसांपूर्वी बीड चे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना अटक झाल्यानंतर अनेक उपजिल्हाधिकारी अतिरिक्त जिल्हाधिकारी ट्रेझरी ऑफिसर यांच्यासहित कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.



राज्यातील सहकारी बँकिंग क्षेत्रात स्वतःला फार साव (शाहू )समजणाऱ्या या बँकेला यापूर्वी देखील अशाच एका प्रकरणात आरबीआय ने कोट्यावधी रुपयांचा दंड ठोठवला होता. भू संपादन घोटाळ्यात तर या बँकेने सर्व हद्द पार करत नियम आणि अटी पायदळी तुडवत भ्रष्टाचार करणाऱ्यांना साथ दिली आहे, त्यामुळे एसआयटी कडून या बँकेची आणि स्थानिक सल्लागाराची चौकशी होणार आहे. शासनाकडून लाभार्थ्यांना मावेजा मंजूर झाल्यानंतर तो त्यांच्या बँकेत चेक द्वारे किंवा आरटीजीएस ने जमा होतो या प्रकरणात मात्र बहुतांश लाभार्थ्यांचे खाते हे बीडच्या भाग्यनगर भागात असलेल्या आणि महापुरुषांच्या नावाने गेल्या अनेक वर्षापासून बँकिंग क्षेत्रात नावारूपास आलेल्या एका सहकारी बँकेत उघडण्यात आले खाते उघडताना ना लाभार्थ्यांचे आधार कार्ड मागितले गेले ना पॅन कार्ड थेट लाभार्थ्यांच्या खात्यात शासनाकडून महावेजापोटी मंजूर झालेली रक्कम जमा करण्यात आली आणि त्याच दिवशी यातील वकिलांचा हिस्सा संजय हंगे आणि इतरांचा हिस्सा तसेच दलालांचा हिस्सा आणि उपजिल्हाधिकारी जिल्हाधिकारी यांचा हिस्सा तातडीने वाटप करण्यात आला. विशेष बाब म्हणजे बँकेने कुठलीही कागदपत्रे न तपासता एकाच दिवशी अनेक खाते ज्या पद्धतीने उघडले आणि त्यातील रक्कम विड्रॉल करून दिली त्याला या बँकेतील एक स्थानिक सल्लागार कारणीभूत असल्याची चर्चा आहे. हा सल्लागार बँकेच्या अधिकाऱ्यांना भेटून, फोनवर खाते उघडण्यास अन पैसे विड्रॉल करून देण्यासाठी सांगत होता. पेठ बीड भागातील हा व्यापारी माने कॉम्प्लेक्स भागात राहतो अशी देखील चर्चा आहे. त्याचा देखील या घोटाळ्यात सहभाग असल्याची माहिती आहे.

महापुरुषांच्या नावाने गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात वेगवेगळ्या जिल्ह्यात शाखांचे जाळे असलेल्या या बँकेच्या भाग्यनगर शाखेतून मात्र काळे धंदे करणाऱ्यांना पाठबळ देण्यात आले. त्यामुळे ज्या पद्धतीने भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात बँकेची चौकशी झाली तशाच पद्धतीने या बँकेची आणि त्या स्थानिक सल्लागाराची देखील एस आय टी मार्फत चौकशी होणार आहे.

## पाटोदा बाजार समितीत कांदा खरेदी केंद्र सुरू करा शेतकऱ्यांची आ. सुरेश धस यांच्याकडे मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये तातडीने कांदा खरेदी व लिलाव प्रक्रिया सुरू करण्यात यावी, अशी आग्रही मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी आमदार सुरेश धस यांच्याकडे केली आहे. तालुक्यात कांद्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असूनही स्थानिक पातळीवर हक्काची बाजारपेठ नसल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका सोसावा लागत आहे.वाहतूक खर्चामुळे शेतकरी मेटाकुटीलासध्या पाटोदा परिसरात कांदा काढणीचा हंगाम वेगाने सुरू आहे. मात्र, स्थानिक बाजार समितीत कांदा खरेदीची सोय नसल्याने शेतकऱ्यांना आपला शेतमाल अहमदनगर, नाशिक किंवा सोलापूर सारख्या लांबच्या बाजारपेठांमध्ये न्यावा लागतो. डिझेलचे वाढलेले दर आणि लांबचा प्रवास यामुळे वाहतुकीचा मोठा खर्च शेतकऱ्यांच्या पदरी पडत आहे. अनेकदा बाजारात मिळणारा भाव आणि झालेला खर्च यांचा ताळमेळ बसत नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.आमदार सुरेश धस यांची सकारात्मक भूमिकाशेतकऱ्यांच्या या मागणीची दखल घेत आमदार सुरेश धस यांनी बाजार समिती प्रशासनाला यावर तातडीने मार्ग काढण्याच्या सूचना दिल्या आहेत. बाजार समिती ही



शेतकऱ्यांच्या हितासाठी आहे. शेतकऱ्यांना त्यांचा माल लांब नेण्याची गरज पडू नये, यासाठी स्थानिक स्तरावर लिलाव प्रक्रिया सुरू करणे आवश्यक आहे, असे आश्वासन त्यांनी दिले आहे.शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या:पाटोदा बाजार समितीत कांद्याचे नियमित लिलाव सुरू करावेत.व्यापाऱ्यांची संख्या वाढवून पारदर्शक पद्धतीने खरेदी व्हावी.शेतकऱ्यांसाठी पिण्याचे पाणी आणि सावलीची सोय बाजार आवारात असावी.कांदा साठवणुकीसाठी (कांदा चाळ) तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळावे.पाटोदा बाजार समितीने जर तातडीने कांदा खरेदी सुरू केली, तर तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. आता बाजार समिती प्रशासन यावर काय निर्णय घेते, याकडे सर्व शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## शैक्षणिक कर्ज मंजूर करूनही वितरण टाळल्याने महाराष्ट्र ग्रामीण बँकेला ग्राहक आयोगाचा दणका

### विद्यार्थ्यास २.७८ लाखांचे कर्ज वाटपासह १० हजारांची नुकसान भरपाई देण्याचे निर्देश

बीड । प्रतिनिधी

शैक्षणिक कर्ज मंजूर करूनही विद्यार्थ्याला वेळेत कर्ज वितरण न करता मानसिक व शैक्षणिक अडचणीत टाकल्याप्रकरणी बीड जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने महाराष्ट्र ग्रामीण बँकेला दणका दिला आहे. वडवणी तालुक्यातील पिंपरखेड येथील बी.टेक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला मंजूर झालेले २ लाख ७८ हजार ३८० रुपयांचे शैक्षणिक कर्ज ३० दिवसांत वितरित करण्याचे तसेच मानसिक त्रास व तक्रार खर्चापोटी १० हजार रुपये देण्याचे आदेश दिले आहेत.

पिंपरखेड येथील सशांत संजय निपटे हा पुणे येथे बी.टेकच्या प्रथम वर्षात शिक्षण घेत असून शिक्षणासाठी त्याने महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या





वडवणी शाखेकडे शैक्षणिक कर्जासाठी अर्ज केला होता. ऑक्टोबर २०२४ मध्ये बँकेकडून आवश्यक कागदपत्रांची माहिती घेऊन त्याने कॉलेज फी कोटेशन, ७/१२ उतारा, आधार कार्ड आदी सर्व कागदपत्रे जमा केली होती. त्यानंतर बँकेने कर्ज मंजुरीची प्रक्रिया सुरू केली. जानेवारी २०२५ मध्ये बँकेने कर्ज मंजूर झाल्याचे सांगत प्रक्रिया शुल्क व कागदपत्र हाताळणी शुल्क म्हणून ६५६ रुपये ९८ पैसे खात्यातून वसूल केले. विद्यार्थ्याने चार लाख रुपयांच्या कर्जाची मागणी केली असताना बँकेने २ लाख ७८ हजार ३८० रुपयांचे शैक्षणिक कर्ज मंजूर केले. मात्र मंजुरीनंतरही रक्कम वितरित करण्यात आली नाही. विद्यार्थ्याने वारंवार पाठपुरावा केल्यानंतर बँकेने २८ फेब्रुवारी २०२५ रोजी लेखी पत्र देत जामीनदार रामप्रताप शिवाजी निपटे यांच्या नावावर थकबाकी असल्याने कर्ज वितरित करता येणार नसल्याचे सांगितले. यावर विद्यार्थ्याने ग्राहक आयोगात धाव घेतली.

सुनावणीदरम्यान तक्रारदाराच्या वतीने रिझर्व्ह बँकेच्या 'मॉडेल ◀◀ पान ३ वर

## बर्दापूर येथे शेतात भीषण आग; शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान



अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर परिसरातील लिबगाव रोडवरील गट नंबर ५७८ मधील शेतात दिनांक १० रोजी दुपारी विद्यूत तारेचे घरशन होवून स्पार्किंग होवून भीषण आग लागून मोठे नुकसान झाल्याची घटना घडली आहे. या आगीत शेतकरी संतोष सत्यनारायण बजाज यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असून जनावरांच्या चाऱ्यासह पाईपलाईन, झाडे व इतर साहित्य जळून खाक झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित शेतातून एलटी वीजवाहिनी गेलेली असून तिच्या तारा सैल झाल्याने दोन्ही तारा एकमेकांवर आदळल्या. त्यातून ठिणगी पडून अचानक भीषण आग लागली. काही क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केल्याने संपूर्ण परिसरात धुराचे लोट पसरले होते. ◀◀ पान ३ वर

## एसएससी बोर्ड परीक्षेत स्वरा निरंजन वाघमारेचे यश

माजलगाव । प्रतिनिधी

नुकत्याच जाहीर झालेल्या एस एस सी बोर्ड परीक्षेत येथील सक्सेस स्कुल ची विद्यार्थिनी स्वरा निरंजन वाघमारे हिने इंग्लिश माध्यमातून माजलगाव मधून सर्व प्रथम येण्याचा मान मिळवला. तिला ९४% गुण मिळाले.



बालपणापासून अभ्यासात हुशार असलेल्या स्वराने मेहनत, जिद्द यांच्या जोरावर हे यश मिळवले. या यशामागे आई, वडील, तसेच यशवंत करिअर अकॅडमी मधील शिक्षक आणि शाळेतील शिक्षकांचे मार्गदर्शन असल्याचे तिने सांगितले. स्वराच्या या यशाबद्दल तिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. विनायक रत्नपारखी, विठ्ठल नाईकनवरे, निखिल वाघमारे, डॉ शंकर जुजगर, श्रीकृष्ण शेजूळ, राजेश कदम, राजेश देशपांडे, डॉ. स्वानंद कुलकर्णी, डॉ सचिन देशमुख आदी मान्यवरांनी स्वराचे अभिनंदन केले आहे.

## कर्तव्यनिष्ठ सेवेला मिळाला सन्मान शेख नसीर सहाय्यक फौजदारपदी पदोन्नती

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा पोलीस स्टेशनमध्ये हेड कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत असलेले कर्तव्यदक्ष पोलीस कर्मचारी शेख नसीर बशीर यांची सहाय्यक फौजदारपदी पदोन्नती झाली असून, त्यांच्या खांद्यावर पोलीस निरीक्षक विनोद घोळवे तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक संभाजी तागड यांच्या हस्ते स्टार लावुन सन्मानीत करण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल पाटोदा तालुक्यासह बीड शहरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.





सन २००० मध्ये पोलीस दलात निवड झाल्यानंतर शेख नसीर यांनी विविध ठिकाणी उल्लेखनीय सेवा बजावली आहे. त्यांनी ठाणे शहर येथे २ वर्षे, केज येथे २ वर्षे, शिरूर कासार येथे २ वर्षे, बॉम्ब शोधक पथकात तब्बल ५ वर्षे, स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) मध्ये ६ वर्षे तसेच पेठ बीड येथे ४ वर्षे सेवा देत आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे.

काही दिवसांपूर्वीच ते आपल्या जन्मभूमी असलेल्या पाटोदा शहरात रुजू झाले असून, खाकी वर्दीतील सेवाभावी आणि जनसामान्यांशी आपुलकीने वागणारे अधिकारी म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. त्यांच्या अथक परिश्रम, प्रामाणिक सेवाभाव आणि कर्तव्यनिष्ठेमुळे मिळालेली ही पदोन्नती अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी असल्याची भावना नागरिकांनी सत्कार प्रसंगी व्यक्त केली. यावेळी बोलताना शेख नसीर म्हणाले, जन्मभूमीत मिळणारा सन्मान हा आयुष्यातील सर्वात मोठा आनंद असतो. वरिष्ठ अधिकारी, सहकारी आणि नागरिकांच्या प्रेमामुळेच ही वाटचाल शक्य झाली.

## आदित्य नर्सिंग महाविद्यालयाचा ७ व्या सत्राचा निकाल १०० टक्के

बीड । प्रतिनिधी

शहरातील आदित्य नर्सिंग महाविद्यालयाने आपल्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा कायम राखत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (चणक्ह), नाशिकच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. महाविद्यालयाचा सातव्या सत्राचा निकाल तब्बल १०० टक्के लागला असून, विद्यार्थ्यांनी विशेष श्रेणीत यश मिळवत संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचा महाविद्यालयात सन्मान करण्यात आला.



प्रदीप गोकुळ भांगे | सुरज शाहू घुले | रचना दीपक अवसरमल | प्रथमेश निकाळजे | साक्षी माने | आचल थाटे

### यशस्वी विद्यार्थ्यांचा महाविद्यालयात सन्मान

#### कठोर परिश्रमाचे फळ

**महाविद्यालयाचा सातव्या सेमिस्टरचा निकाल १०० टक्के लागणे ही अभिमानास्पद बाब आहे. विद्यार्थ्यांनी शिस्त आणि समर्पणाच्या जोरावर हे यश मिळवले. भविष्यात हे विद्यार्थी उत्कृष्ट परिचारिका बनून समाजसेवा करतील, असा विश्वास वाटतो.**

**-डॉ. आदिती सारडा (संचालिका, आदित्य शिक्षण संस्था, बीड**

या यशाबद्दल आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यापीठाने जाहीर केलेल्या निकालात आदित्य नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी सर्वच ◀◀ पान ३ वर

## अखेर ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनाला यश मागणी मान्य, तूर्तास २५ मे पर्यंत आंदोलन स्थगित

परळी । प्रतिनिधी

ऊस उत्पादक शेतकऱ्यांची थकलेली ऊस बिलाची रक्कम, तोडणी मजुरी, वाहतूक व कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करणे याबाबत ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने ओंकार शुगर्स समोर सुरू केलेल्या सत्याग्रह आंदोलनास दुसऱ्या दिवशी रात्री उशिरा सुरूच होते शेवटी शेतकऱ्यांनी आक्रमक होत कारखान्याच्या गाड्या अडवायला सुरुवात केली असता कारखाना प्रशासनाने



शेतकरी एकजुटी पुढे नमती भूमिका घेत १५ दिवसात सर्व ऊस देयक अदा करण्याचे लेखी आश्वासन दिल्याने संघर्ष समितीने हे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आल्याचे समिती मार्फत सांगण्यात आले. पांगरी, लिंबुटा, टाकळी व कारखाना क्षेत्रातील शेतकऱ्यांची एकजुट यामुळे दिलेल्या लढ्याला यश मिळाल आहे.

सत्याग्रह आंदोलनाची धास्ती घेत कारखाना प्रशासनानं १८००/प्रति ◀◀ पान ३ वर

## श्री.शनैश्वर जन्मोत्सव सोहळ्या निमित्त भव्य शोभायात्रा संपन्न अखंड शिवनाम सप्ताह व परमरहस्य पारायण सोहळ्यास सुरुवात

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

भजनाच्या तालावर पावले खेळत चालणाऱ्या, एकाच रंगाच्या आकर्षक साड्या घालून सर्वांचे लक्ष वेधणाऱ्या तसेच मंगल कलश मस्तकी धारण केलेल्या, हाती भगवा निशाण फडकावत मुखी गुरुराज माऊलीचा गजर करणाऱ्या महिला भगिनी आणि पांढऱ्या शुभ्र पोशाखात जय शनैश्वर च्या टोप्या परिधान केलेल्या व दोन-दोनच्या रांगेत शिस्तीने चालणाऱ्या पुरुषांनीही शनिवारी (ता.०९) श्री शनैश्वर जन्मोत्सव आणि अखंड शिवनाम सप्ताह निमित्ताने निघालेल्या शोभायात्रेची





शोभा वाढवली.

येथील बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याशी श्री.शनैश्वर मंदिर आहे. या मंदिरात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर जन्मोत्सव साजरा केला जातो. यानिमित्ताने शोभायात्रेचे आयोजन करण्यात येत आहे. या शोभा यात्रेची सुरुवात मोंढा मैदानातील हनुमान मंदिरापासून सायंकाळी सहा वाजता झाली. नियोजनानुसार महिला भगिनींनी भगव्या पताका, मंगल कलश, एकाच रंगाच्या साड्या तसेच शाळकरी मुला-मुलींनी विविध संतांच्या केलेल्या वेशभूषा तर पुरुष मंडळींनी पांढराशुभ्र पोशाख व जय शनैश्वर च्या टोप्या परिधान केलेल्या आणि शिस्तीत गुरुराज माऊलीचा जयघोष करत या शोभायात्रेत सहभाग घेतला. श्री हनुमान मंदिरापासून निघालेली ही शोभायात्रा राणी लक्ष्मीबाई टॉवर मार्गे श्री शनि मंदिरात पोहोचली. राणी लक्ष्मीबाई टावर जवळ नगरसेवक अश्विन मोगरकर यांनी आणि तळ भागात नगरसेवक जयराज देशमुख यांनी या शोभायात्रेचे स्वागत आकर्षक फटाके वाजवून श्रीस पुष्पहार अर्पण ◀◀ पान ३ वर

## मातृत्व सप्ताहानिमित्त बीडमध्ये महिलांसाठी मोफत मुळव्याध तपासणी शिबीर

### डॉ. शितल भोपळे यांचा पुढाकार; ११ ते १६ मे दरम्यान भोपळे हॉस्पिटलमध्ये आयोजन

बीड । प्रतिनिधी

आरोग्य सेवेसोबतच सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या प्रसिद्ध महिला मुळव्याध तज्ज्ञ डॉ. शितल अक्षय भोपळे यांच्या वतीने 'जागतिक मातृत्व दिना'चे औचित्य साधून विशेष 'मातृत्व सप्ताह' साजरा केला जात आहे. या सप्ताहानिमित्त शहरातील जालना रोडवरील भोपळे हॉस्पिटल येथे ११ ते १६ मे या कालावधीत महिलांसाठी मोफत मुळव्याध तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

अनेकदा महिला संकोच किंवा भीतीपोटी मुळव्याध, भगंदर यांसारख्या व्याधींकडे दुर्लक्ष करतात किंवा कोणाला सांगत नाहीत. मात्र, हे आजार वेळीच ओळखून उपचार करणे गरजेचे असते. महिलांचा हा संकोच दूर व्हावा आणि त्यांना तज्ज्ञ उपचार मिळावेत, या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. शिबिरात महिला रुग्णांची तपासणी डॉ. शितल भोपळे व त्यांच्या तज्ज्ञ महिला डॉक्टरांच्या



टीममार्फतच केली जाणार आहे. सोमवार दि. ११ ते शनिवार दि. १६ मे, सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत रूग्णांची तपासणी केली जाणार आहे. शिबिरात सहभागी होणाऱ्या रुग्णांना पुढील औषधोपचारांमध्ये विशेष सवलत दिली ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# महिला रेल्वे लाईन ओलांडताना अचानक मालगाडी आली ; पाटसमध्ये अंगावर शहारे आणणारा प्रसंग

**पुणे । प्रतिनिधी**

पाटस रेल्वे स्थानकावर शनिवारी सकाळी एका ज्येष्ठ महिलेने दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला आहे. रेल्वे लाईन ओलांडत असताना अचानक मालगाडी सुरू झाल्याने महिलेने क्षणाचाही विलंब न करता थेट रुळांच्या मध्यभागी झोपून स्वतःचा जीव वाचवला आहे. हा अंगावर शहारे आणणारा प्रसंग पाहून स्थानकावरील प्रवाशांच्या काळजाचा ठोका चुकला.




शनिवारी (दि ९) सकाळी एक ज्येष्ठ महिला पाटस रेल्वे स्थानकावर रेल्वे रुळ ओलांडत होती. त्याच दरम्यान अचानक मालगाडी सुरू झाली. मागे-पुढे जाण्यास वेळ नसल्याचे लक्षात येताच महिलेने प्रसंगावधान दाखवत रुळांच्या मधोमध आडवी झोप घेतली. मालगाडीचे सर्व डबे तिच्या अंगावरून गेले, मात्र सुदैवाने तिला कोणतीही दुखापत झाली नाही. गाडी गेल्यानंतर ती सुखरूप बाहेर आली. त्यामुळे हा क्षण पाहत असलेल्या प्रवाशांनी महिला सुखरूप दिसल्याने सुटकेचा निःश्वास टाकला मात्र तो दोन मिनिटांचा प्रसंगाने त्या ठिकाणी असलेल्या प्रवाशांच्या अंगावर शहारे आणणारा ठरला. या घटनेमुळे पाटस रेल्वे स्थानकावरील प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा गंभीर बनला आहे. पाटस रेल्वे स्थानकावर ओव्हर ब्रिजचे काम एका बाजूलाच पूर्ण झाले आहे. त्यामुळे कानगाव बाजुकडे पादचारी पुलाचे काम करण्याची मागणी मागील काही दिवसापूर्वी अ‍ॅड. संदीप ससाणे आणि स्थानिक नागरिकांनी पुणे आणि मुंबई रेल्वे प्रशासनाकडे केली होती. रेल्वे प्रशासनाकडे अनेक वेळा पत्रव्यवहार, बैठका व निवेदने देऊन पाटस स्थानकावर फूट ओव्हर ब्रिज व सुरक्षित पादचारी मार्गाचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली आहे. मात्र, काम मंजूर होऊनही अपेक्षित गतीने होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. काम मंजूर होऊनही वेळेत पूर्ण होत नसेल आणि निष्काळजीपणामुळे एखाद्या प्रवाशाचा जीव गेला तर त्याचा काय उपयोग? असा संतप्त सवाल नागरिक आणि प्रवाशी विचारत आहेत. पाटस स्थानकावरील फूट ओव्हर ब्रिजचे काम युद्धपातळीवर पूर्ण करावे, स्टेशन परिसरात कायमस्वरूपी आरपीएफ जवान तैनात करावेत, प्रवाशांसाठी सुरक्षित पादचारी मार्गाची तात्काळ व्यवस्था करावी, रखडलेली इतर पायाभूत सुविधा आणि विकासकामे त्वरित मार्गी लावावीत, रेल्वे प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पाटस व परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे.

# बालभारतीकडून २री ते ६वीसाठी नवीन पाठ्यपुस्तकांचा निर्णय

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ अर्थात 'बालभारती'तर्फे २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात जून २०२६ मध्ये इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी, आणि सहावीची पाठ्यपुस्तके नव्याने प्रकाशित होणार आहेत, त्यामुळे पालकांनी ही नवीन अभ्यासक्रमाची पुस्तके खरेदी करावीत, असे 'बालभारती'च्या संचालिका अनुराधा ओक यांनी स्पष्ट केले आहे.



'बालभारती'ची कोणती पुस्तके घ्यावीत आणि कोणती घेऊ नयेत, याबाबत 'बालभारती'ने पत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ हे इयत्ता पाचवी, सातवी, नववी आणि अकरावी या इयत्तांच्या पाठ्यपुस्तकांचे शेवटचे वर्ष असणार आहे. त्यामुळे या इयत्तांच्या पाठ्यपुस्तकांची खरेदी आवश्यकतेनुसार करावी, अशा सूचना 'बालभारती'तर्फे संबंधितांना करण्यात आल्या आहेत. इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीच्या विद्यार्थ्यांना इंग्राजी माध्यमासाठी 'शिकू मराठी आनंदे' तसेच हिंदी, उर्दू ,गुजराती, कन्नड, सिंधू, तेलुगू, तमिळ व बंगाली या इतर माध्यमांसाठी 'करू मैत्री मराठीशी' ही मराठी भाषेची अनिवार्य पुस्तके उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. इयत्ता सहावीसाठी हिंदी सुलभभारती व हिंदी सुगमभारती, तसेच सुगम भारती (कन्नड संयुक्त) तारुफे उर्दू, सिंधू भारती अरे /देव, तेलुगू सरल भारती, गुजराती साहित्य परिचय ही पुनर्मुद्रण (जुन्या अभ्यासक्रमाची) वैकल्पिक पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. इयत्ता पाचवी, सातवी व इयत्ता आठवीच्या एकात्मिक व नियमित पाठ्यपुस्तकांमधील आशय मूल्यमापन योजना समान आहे. तसेच ही दोन्ही प्रकारची पाठ्यपुस्तके प्रचलित अभ्यासक्रमावर आधारित आहेत. ही पाठ्यपुस्तके भांडारात शिल्लक असून, विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

इयत्ता नववी ते बारावीसाठी विषय योजना व मूल्यमापन योजनेनुसार विद्यार्थ्यांनी या इयत्तांसाठी 'बालभारती'ने तयार केलेल्या प्रात्यक्षिक नोंदवहीचा वापर करणे बंधनकारक राहील, कोणत्याही शैक्षणिक संस्थेने खासगी प्रकाशकांच्या प्रात्यक्षिक नोंदवहीचा वापर करण्याचे बंधन किंवा सक्ती विद्यार्थ्यांवर करू नये.

स्वाध्याय पुस्तिकांवर मिळणार ४० टक्के सूट

पाठ्यपुस्तक महामंडळातर्फे महाराष्ट्रातील शिक्षण तज्ज्ञ व अनुभवी शिक्षकांनी मराठी व इंग्राजी माध्यमातील इयत्ता आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी विविध विषयांच्या वैशिष्ट्यपूर्ण व दर्जेदार स्वाध्याय पुस्तिकांची निर्मिती केलेली आहे. या स्वाध्याय पुस्तिकांच्या दर्शनी किमतीवर ४० टक्के सूट देण्यात येत आहे, तरी विद्यार्थ्यांनी या स्वाध्यायपुस्तिकांचा वापर करावा, असे देखील ओक यांनी स्पष्ट केले आहे.

# पुण्यात मातामृत्यूचे प्रमाण घटले! गर्भवतींची वेळेवर तपासणी ठरली प्रभावी

**पुणे । प्रतिनिधी**

मातृदिनाच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरासाठी एक दिलासादायक बाब समोर आली आहे. गेल्या काही वर्षांत शहरातील मातामृत्यूदरात सातत्याने घट होत असून, सुरक्षित मातृत्वासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांचे सकारात्मक परिणाम दिसत आहेत. गर्भवतींची वेळेवर तपासणी, उच्चजोखीम गर्भधारणांची ओळख, शासकीय रुग्णालयांतील सुरक्षित प्रसूती आणि प्रसूतीनंतरची देखरेख यामुळे अनेक मातांचे जीव वाचत असल्याचे महापालिका आरोग्य विभागाच्या अहवालातून स्पष्ट झाले आहे.



आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, २०२३-२४ मध्ये शहरात ७९ मातामृत्यूंची नोंद झाली होती. पुढील वर्षात हा आकडा ६७ वर आला, तर २०२५-२६ मध्ये तो आणखी घटून ४५ पर्यंत पोहोचला आहे. मातामृत्यूदरही १२२ वरून ७७ पर्यंत खाली आला असून, आरोग्य विभागासाठी ही महत्त्वाची सकारात्मक नोंद मानली जात आहे. राज्य पातळीवरही परिस्थितीत सुधारणा होताना दिसत आहे. आरोग्य विभागाकडून गर्भवती महिलांसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. नियमित आरोग्य तपासण्या, आयर्न आणि फॉलिक सिड गोळ्यांचे वितरण, जननी सुरक्षा योजना, मोफत रक्ततपासण्या आणि प्रसूतीपूर्व समुपदेशन याचा मोठा फायदा होत आहे. विशेषतः 'हाय रिस्क प्रेग्नन्सी' असलेल्या महिलांवर अधिक लक्ष केंद्रीत केले जात आहे. पुणे हे राज्यातील मोठे उपचार केंद्र असल्याने इतर जिल्ह्यांमधूनही गंभीर रुग्ण उपचारासाठी येथे येतात. त्यामुळे काही प्रमाणात आकडेवारीवर त्याचा परिणाम होत असल्याचे आरोग्य अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. तथापि, प्रसूतीनंतरचा काळ अजूनही चिंतेचा विषय ठरत आहे. २०२५-२६ मधील ४५ मातामृत्यूंपैकी ३४ मृत्यू हे प्रसूतीनंतर झाल्याचे समोर आले आहे. वेळेत उपचार न मिळणे, अतिरिक्तस्राव, रक्तदाबातील गुंतागुंत आणि उशिरा रुग्णालयात दाखल होणे ही त्यामागील प्रमुख कारणे असल्याचे आरोग्य विभागाने नमूद केले. 'आई सुरक्षित असेल, तर संपूर्ण कुटुंब सुरक्षित राहते,' असे सांगत आरोग्य तज्ज्ञांनी गर्भधारणेपासून प्रसूतीनंतरच्या काळापर्यंत सातत्याने वैद्यकीय देखरेखीचे महत्त्व अधोरेखित केले. मातृदिनाच्या निमित्ताने सुरक्षित मातृत्वाबाबत जागरूकता वाढविण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

# लोणावळा अत्याचार प्रकरणाची निलम गोऱ्हेंनी घेतली दखल; प्रशासनाला दिल्या 'या' महत्वाच्या सूचना

**पुणे । प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील जवन (पवना डॅम) येथे ऑगस्ट २०२४ मध्ये अल्पवयीन मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात दिनांक ५ मे रोजी गुन्हा दाखल झाल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत विधान परिषद उपसभापती व शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज लोणावळा येथे वरिष्ठ प्रशासकीय व पोलीस अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली.



बैठकीनंतर डॉ. गोऱ्हे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी सांगितले की, पीडित मुलीचे शिक्षण पूर्ण होण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार सर्व मदत केली जाईल. शासनाच्या विविध योजनांचा लाभ तिला मिळवून देण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या आहेत. पोक्सो प्रकरणात पीडितेच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्याचे डॉ. गोऱ्हे म्हणाल्या. महिला दक्षता समितीसोबत अनौपचारिक महिला कोअर टीम तयार करावी, ज्यात महिला लोकप्रतिनिधींचा समावेश असेल. यामुळे महिलांवरील अत्याचारांची माहिती तातडीने मिळू शकेल, असे त्यांनी सांगितले. तसेच, या तालुक्यातील २५ हजार लाडक्या बहिणींना या टीममध्ये सामील करून त्यांना सुरक्षेच्या बाबतीत जबाबदारी देण्याच्या सूचनाही अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. भरोसा सेल आणि वन स्टॉप क्रायसिस सेंटरने पीडित मुलीची भेट घेऊन तिच्या समुपदेशनाची व्यवस्था केली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

याखेरीज, बालसंगोपन योजनेचा लाभ पीडितेला द्यावा. समुपदेशन मास्टर ऑफ सोशल वर्क पदवीधर महिलांकडून करावे. आरोग्य, शिक्षण आणि स्वावलंबनासाठी विशेष उपाययोजना राबवाव्यात अशा सूचना अधिकाऱ्यांना डॉ. गोऱ्हे यांनी दिल्या.

डॉ. गोऱ्हे यांनी यापूर्वी विसापूर येथील घटना व रस्त्यातून मुलीला उचलून नेण्याच्या प्रकरणाचा आढावा घेतला. या दोन्ही प्रकरणांमध्ये चार्जशीट दाखल झाले असून लवकरच कोर्टात खटला उभा राहणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली, असे त्यांनी सांगितले. या बैठकीला, प्रांताधिकारी सुरेंद्र नवले, तहसीलदार विक्रम देशमुख, पोलीस उपअधीक्षक गजानन टोम्पे, पोलीस निरीक्षक दिनेश तायडे, सहायक पोलीस निरीक्षक विजया म्हेत्रे, चाईल्ड डेव्हलपमेंट प्रोजेक्ट ऑफिसर नेहा ठाकूर, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी रोहिणी ढवळे आदी अधिकारी उपस्थित होते.

# पुणे-मंगलोर थेट विमानसेवा १ जूनपासून सुरू होण्याची शक्यता

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्याहून कर्नाटकच्या किनारपट्टीवरील महत्त्वाचे शहर असलेल्या मंगलोर (मंगळुरू) साठी लवकरच थेट विमानसेवा सुरू करण्याचे नियोजन पुणे विमानतळ प्रशासनाकडून सुरू आहे. १ जून रोजी ही नवीन विमानसेवा सुरू होण्याची शक्यता असून, या विमानसेवेमुळे पुणेकरांसाठी आणि विशेषतः दक्षिण भारतात वारंवार प्रवास करणाऱ्यांना मोठा फायदा होणार आहे.

उन्हाळी सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर विमानतळावरील स्लॉटमध्ये (विमानांच्या येण्या-जाण्याच्या वेळा) वाढ करण्यात आली आहे. यामुळे नवीन मार्ग सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाल्याने १ जूनपासून मंगलोर शहरासाठी ही सेवा प्रत्यक्ष सुरू करण्याच्या हालचाली विमानतळ प्रशासनाकडून सुरू झाल्या आहेत. सध्या पुणे ते मंगलोर प्रवासासाठी प्रवाशांना रेल्वे किंवा खासगी बसवर अवलंबून राहावे लागते, त्यासाठी १० ते १५ तासांचा वेळ लागतो. थेट विमानसेवा सुरू झाल्यामुळे हा प्रवास अवघ्या दीड ते दोन तासांत पूर्ण होणार आहे. यामुळे व्यापारी, पर्यटक आणि कामानिमित्त प्रवास करणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

मंगलोर हे फक्त एक शहर नसून, कर्नाटकच्या किनारपट्टीवरील एक प्रमुख औद्योगिक आणि व्यापारी केंद्र आहे. मंगलोर हे कर्नाटकचे एकमेव असे शहर आहे, जिथे हवाई, रस्ते, रेल्वे आणि सागरी (बंदर) अशा चारही प्रकारच्या वाहतूक सुविधा उपलब्ध आहेत. येथे प्रामुख्याने तुलू, कन्नड, कोकणी आणि बेअरी भाषा बोलल्या जातात. अरबी समुद्र आणि सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये वसलेले हे शहर पर्यटनासाठीही प्रसिद्ध आहे. प्रवाशांची वाढती मागणी लक्षात घेता, उन्हाळी वेळापत्रकात नवीन विमान सेवांना परवानगी दिली आहे. त्यानुसार मंगलोरसाठी नवीन सेवा सुरू करण्याचे आमच्याकडून नियोजन सुरू आहे, असे पुणे विमानतळाचे संचालक संतोष ढोके यांनी सांगितले.

# कोर्टाने सील केलेल्या दुकानांचे कुलूप तोडले; दोघांविरोधात गुन्हा दाखल

**पिंपरी । प्रतिनिधी**

एमआयडीसी भोसरी परिसरातील न्यायालयीन आदेशानुसार सील करण्यात आलेल्या दुकानांचे सील तोडून तेथे दुसरे कुलूप लावल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी अद्याप फरार आहेत.

याप्रकरणी संदीप प्रकाश पाटील (वय ४२, रा. नवी सांगवी, पुणे) यांनी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार राजेंद्र अजित सिंग सोहळ आणि त्यांची पत्नी नीलम सोहळ यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, इंद्रायणीनगर येथील जयदीप बिझनेस सेंटर अपार्टमेंट कंडोमिनियमच्या तिसऱ्या मजल्यावरील शॉप क्रमांक ०७ आणि ०८ हे न्यायालयीन आदेशानुसार कोर्ट कमिशनर यांच्या उपस्थितीत सील करण्यात आले होते. संबंधित दुकाने डीसीबी बँक लिमिटेडच्या ताब्यात देण्यात आली होती. मात्र, २९ मार्च ते ७ मे या कालावधीत आरोपींनी संबंधित दुकानांचे सील तोडून तेथे दुसरे कुलूप लावल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या प्रकरणी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# मामाच्या मुलीवर लाइन मारल्याच्या संशयातून तरुणावर जीवघेणा हल्ला; दोघांना १० वर्षांची शिक्षा

**पुणे । प्रतिनिधी**

घरासमोर येऊन हॉर्न वाजवीत मामाच्या मुलीवर लाइन मारत असल्याच्या गैरसमजातून तरुणास जिवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोघांना न्यायालयाने दहा वर्षे सक्तमुजरी आणि प्रत्येकी ५१ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

अमोल बाळासाहेब बोरकर (वय ३३) आणि सागर विजय काळे (वय ३३, रा. दोघेही रा. काळेपडळ) अशी शिक्षा झालेल्यांची नावे आहे. सत्र न्यायाधीश एस. आर. अग्रावाल यांनी हा निकाल दिला. दंडाच्या रकमेतून ८० हजार रुपये जखमीस देण्यास यावे, दंड न भरल्यास सहा महिने अतिरिक्त कारावास भोगावा लागेल, असेही निकालात नमूद करण्यात आले आहे. ही घटना २५ जून २०१८ रोजी काळेपडळ परिसरात घडली. प्रतीक सकपाळ (वय २०) असे घटनेतील जखमी तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी, मारुती सकपाळ यांनी हडपसर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. प्रतीक हा फिर्यादी मारुती यांचा मुलगा आहे. प्रतीक याचा मित्र हा आरोपीच्या शेजारी राहण्यास आहे. तो मित्राला भेटायला जात असताना घरासमोर हॉर्न वाजवीत होता. यावरून, प्रतीक हा मामाच्या मुलीवर लाइन मारत असल्याचा गैरसमज आरोपींमध्ये निर्माण झाला. त्यातून आरोपींनी प्रतिकला हडपसर येथील ग्लायडिंग सेंटर येथे धारदार शस्त्राने मारहाण करत जिवे मारण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी, आरोपींना अटक करीत दोषारोपपत्र दाखल केले. सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी वकील नामदेव तरळगट्टी यांनी कामकाज पाहिले.

# राहू-खामगाव गटात भाजपला धक्का; छुप्या मतदानामुळे राष्ट्रवादीचा विजय

**दौंड । प्रतिनिधी**

दौंड तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांचे रणशिंग शमल्यानंतर आता राजकीय गणितांच्या चर्चांना उधाण आले आहे. तालुक्यात राष्ट्रवादी कॉँग्रेसने जिल्हा परिषदेच्या सहा जागांवर वर्चस्व मिळवले असले तरी पंचायत समितीवर मात्र आठ जागा जिंकत भाजपने आपले 'कमळ' फुलवले आहे. मात्र, या संपूर्ण निकालात सर्वाधिक चर्चा होत आहे, ती राहू-खामगाव जिल्हा परिषद गटाची. या हक्काच्या गटातील पराभव भाजपच्या चांगलाच जिव्हारी लागला असून, आता पक्षांतर्गत गद्दारी करणाऱ्या कार्यकर्त्यांची अवस्था 'इकडे आड तिकडे विहीर' अशी झाली आहे.

राहू-खामगाव गट हा भाजपचा बालेकिल्ला मानला जात होता. मात्र, या निवडणुकीत राष्ट्रवादी कॉँग्रेसचे उमेदवार सागर शेलार यांनी भाजपचे अनिल सोनवणे यांचा पराभव करत सर्वांनाच धक्का दिला. या पराभवाचे मुख्य कारण म्हणजे भाजपच्याच अनेक कार्यकर्त्यांनी छुप्या पद्धतीने शेलार यांचा केलेला प्रचार आणि त्यांना केलेले मतदान, असल्याची चर्चा आता उघडपणे होऊ लागली आहे. आपल्याच उमेदवाराच्या विरोधात काम केल्याने हा गड भाजपच्या हातून निसटला. ज्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीला छुपा पाठिंबा दिला, त्यांची अवस्था आता अत्यंत केविलवाणी झाली आहे. एकीकडे आपल्याच पक्षाच्या उमेदवाराला




पाडल्यामुळे आमदार राहुल कुल यांच्यासमोर जाण्याची या कार्यकर्त्यांची हिंमत होत नाहीये. तर दुसरीकडे, ज्या सागर शेलार यांना निवडून आणण्यासाठी जीवाचे रान केले, त्यांच्यासोबत उघडपणे फिरणेही आता या कार्यकर्त्यांना जड जात आहे. विश्वासू असूनही ऐनवेळी पाठीत खंजीर खुपसल्याची भावना भाजपच्या निष्ठावान गोटात असल्याने या 'छुप्या' समर्थकांची पक्षात मोठी कोंडी झाली आहे.

सध्या राज्यात भाजप आणि राष्ट्रवादी कॉँग्रेस (अजित पवार गट) महायुतीमध्ये एकत्र आहेत. मात्र, आगामी काळात हा मतदारसंघ पुन्हा भाजपकडेच राहण्याचे संकेत मिळत असल्याने या कार्यकर्त्यांच्या अडचणीत अधिकच भर पडली आहे. स्वकीयांनीच धोका दिल्याने आमदार राहुल कुल भविष्यात या कार्यकर्त्यांवर काय भूमिका घेणार याकडे लक्ष लागले आहे.

भविष्यात पुन्हा भाजपचेच काम करावे लागणार असल्याने आता कोणत्या तोंडाने पक्षश्रेष्ठींकडे जावे, या विचाराने कार्यकर्ते सध्या 'चलबिचल' अवस्थेत आहेत. राहू-खामगावच्या या राजकीय नाट्यामुळे दौंडच्या राजकारणात 'गद्दारी' आणि 'एकनिष्ठता' यावर मोठी चर्चा सुरू झाली आहे. विजयाचा गुलाल सागर शेलार यांनी उधळला असला, तरी भाजपच्या त्या छुप्या कार्यकर्त्यांना मात्र आता पराभवापेक्षाही स्वतःच्या राजकीय भविष्याची अधिक भीती वाटू लागली.